गुरुवार, २७ जुलै २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक -३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • THURSDAY 27 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-03 • ISSUE-3 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

## आदिवासी गरोदर महिलेच्या मृत्यूस सरकारच जबाबदार : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात रस्त्यांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले असतानाही रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य आहे तर दुसरीकडे गाव-खेड्यात, आदिवासी पाड्यात रस्तेच नाहीत. रस्ता नसल्याने इगतपुरीतल्या आदिवासी गरोदर महिलेचा मृत्यू झाला, हे महाराष्ट्राला भुषणावह नाही. आदिवासी गरोदर महिलेचा हा मृत्यू नसून एकप्रकारची हत्या आहे तसेच शासकीय असंवेदनशीलतेचा बळी आहे. आदिवासी गरोदर महिलेच्या मृत्यूस शासनच जबाबदार आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

यासंदर्भात प्रसार माध्यमांना माहिती देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, इगतपुरी प्रश्नावर विधानसभेत काँग्रेस पक्षाने नियम ५७ अन्वये चर्चा करण्याची मागणी केली. सर्व कामकाज बाजूला सारून चर्चा घडवावी ही काँग्रेसची मागणी होती. राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे एका आदिवासी गरोदर महिलेचा मृत्यू झाला आहे, ही भूषणावह घटना नाही. आदिवासी असले म्हणून त्यांना जगण्याचा अधिकार नाही का? सर्वांनाच जगण्याचा अधिकार आहे पण भाजपाप्रणित सरकारमध्ये मुठभर लोकांसाठी सोईसुविधा आहेत. गरिब, आदिवासी, गाव-खेड्यातील लोकांसाठी सुविधा नाहीत. भाजपा सरकारमध्ये आदिवासी, मागास समाजावर अन्याय होत आहे. सरकार मस्तीत वागत आहे पण सरकारची ही मस्ती जनताच उतरवेल. सरकारने कालच ४१ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजुर करुन घेतल्या. हा पैसा सरकार कुठून आणणार आहे, सरकार जनतेच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा करत आहे. सरकार रस्त्यांवर खर्च करते पण जेथे रस्त्यांची गरज आहे तेथे रस्ते का नाहीत. इगतपुरीच्या आदिवासी महिलेचा मृत्यू रस्ता नसल्याने झाला आहे. भाजपा सरकार जनतेच्या प्रश्नावर सातत्याने डोळेझाक करत आहे. पत्रकाराच्या प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, देशातील व राज्यातील रस्ते टोलमुक्त करण्याचे आश्वासन भाजपाने २०१४ साली दिले होते पण अजूनही टोलमुक्त रस्ते झाले नाहीत. भाजपा सत्तेत येताच टोलमध्ये वाढ करण्यात आली, डिझेल, पेट्रोलच्या किमती वाढवल्या. रस्ते विकासाच्या नावाखाली कर घेतात व वरुन टोलही वसूल करतात, ही जनतेची दुहेरी लुट सुरु आहे. टोलबंदी करणारेच आता टोलचे समर्थन करत आहेत, असेही नाना पटोले म्हणाले.

**स्थगन प्रस्तावाद्वारे सभागृहात चर्चेची मागणी :** इगतपुरीतील आदिवासी महिलेला वेळेवर उपचार मिळत नाही, सुविधा मिळत नाही आणि तिचा मृत्यू होतो हे महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला शोभणारे नाही, सरकारने या परिस्थितीकडे गंभीरपणे पाहण्याची आवश्यकता आहे, असे मत काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले . इगतपुरी आणि मोखाडा या आदिवासी दुर्गम बहुल भागात केवळ सुविधा नसल्याने दोन गर्भवती महिला दगावल्या .
हा मुद्दा आज विधिमंडळ अधिवेशनात स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित करण्यात आला, मात्र सरकारने या विषयावर सभागृहात चर्चा नाकारली . थोरात म्हणाले, इगतपुरी मध्ये सरकारच्या उदासीन कारभाराचा नमुना बघायला मिळाला .
इगतपुरीतील एका महिलेला प्रसूती वेदना असेही झाल्याने तिला इगतपुरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र तेथे डॉक्टर उपलब्ध नव्हते त्यामुळे तिला वडीव येथे असलेल्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तिथे तिचा दुर्दैवी अंत झाला .



## चंद्रपूर जिल्ह्यातील शाळांना आज सुटी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार गुरुवारी चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या अतिवृष्टीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये, याकरिता जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा, विद्यालय व महाविद्यालय यांना गुरुवारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी निर्गमित केले असून नागरिकांनी हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# खतांचे लिंकिंग करणाऱ्या कंपन्यांच्या मालकांवरही आता होणार गुन्हे दाखल

## बोगसगिरीवर आळा घालण्यासाठी कायद्याची व्यापक संरचना सुरू : धनंजय मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मोठ्या व प्रसिद्ध असलेल्या कंपन्या जास्त मागणी असलेल्या खताच्या सोबत आपल्याकडे उत्पादित करण्यात आलेले परंतु विक्री होत नसलेली खते शेतकऱ्यांना खरेदी करण्यासाठी डीलर व कृषी सेवा केंद्रांना सक्ती करायला लावतात. गरज नसताना पैसे खर्चून शेतकऱ्यांना ती खते विकत घ्यावी लागतात, यावर चाप बसवण्याच्या दृष्टीने आता थेट संबंधित कंपनीच्या मालकावरच गुन्हा दाखल करण्याचे प्रावधान अस्तित्वात आणले जाईल; अशी माहिती राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभेत बोलताना दिली आहे.**

कोणत्याही कंपनीचे खत बाजारात आणण्यापूर्वी त्या खतांची चाचणी करून त्याचे प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे. अप्रमाणित खते कोणत्याही परिस्थितीत बाजारात येणार नाहीत, याचीही काळजी कृषी विभाग घेत असून यापुढे अधिक गांभीर्याने ती काळजी घेतली जाईल, असेही यावेळी धनंजय मुंडे म्हणाले. प्रश्नोत्तराच्या तासात खतांच्या तपासणीचे काम नागपूर जिल्ह्यात बंद असल्याचा तारांकित प्रश्न आमदार मोहन मते यांनी



उपस्थित केला होता. त्याचबरोबर याला अनुसरून आमदार बाळासाहेब थोरात, आमदार नाना पटोले, आमदार अनिल देशमुख, आमदार राजेश टोपे, आमदार बाळासाहेब पाटील, आमदार रोहित पवार, आमदार किशोर पाटील, आमदार आशिष शेलार, यांसह बऱ्याच सदस्यांनी आपले प्रश्न उपस्थित केले. त्यावर कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी सविस्तर उत्तर दिले. खतांबरोबरच बियाणे, कीटकनाशके यांच्या उत्पादन व विक्रीमध्ये बऱ्याच प्रमाणात बोगसगिरी करून शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. यावर आळा बसावा यासाठी राज्य शासन नव्याने अधिक कडक कायदा आणत असून त्या कायद्याची संरचना मंत्रिमंडळ उपसमितीच्या माध्यमातून सुरू आहे. या कायद्याची निर्मिती करत असताना कृषी सेवा केंद्रांच्या संघटना, व्यापारी, डीलर्स यांच्या संघटना तसेच विविध तज्ज्ञांचेही सल्ले घेतले जात आहेत. या सर्वांना विचारात घेऊनच कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, तसेच कायद्यात कोणतेही त्रुटी राहणार नाही अशा पद्धतीने या कायद्याची संरचना करण्यात येत असल्याचे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

आधुनिक केसरी
द्वितीय वर्धापनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा




शुभेच्छुक
प्रो. प्रा. श्रीकांत पाटील
M/s पाटील कन्स्ट्रक्शन
संख, ता. जत, जि. सांगली




जिल्हा आरोग्य समिती उस्मानाबाद
नागरिकांना पावसाळ्यात काळजी घेण्याचे आवाहन

पिण्याचे पाणी उकळून व गाळून प्यावे. शक्य असल्यास फिल्टर पाणी प्यावे. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये. गच्चीवरील व घराच्या परिसरातील भंगार साहित्य रिकाम्या बाटल्या, करवंट्या, रंगाचे डब्बे, उघड्यावरील टायर्स नष्ट करावे. फुलदाण्या, ट्रे, फेंगशुई यामध्ये साचलेले पाणी, साठविण्याच्या टाक्या, ड्रम, भांडी आठवड्यातून एकदा त्यामधील संपुर्ण पाणी काढून पुर्णपणे कोरडे करावे.
शक्य असल्यास डास प्रतिबंधात्मक मच्छरदाणीचा वापर करावा. आपले घर, कार्यालय व परिसरात पाणी साचू न देण्याची काळजी घ्यावी.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

असं म्हणून श्यामराव तिथून निघाले. श्यामलाताई म्हणाल्या, ' बाळांनो, वड, पिंपळ, कडुलिंब, औदुंबर आणि आपली सगळीच झाडे अतिशय औषधी आहेत बरं का ! ते आपल्याला ऑक्सिजन तर देतातच पण आपले अनेक आजारही बरे करतात. कडुलिंबाच्या काडीने नियमितपणे दात घासल्यास दातांना कीड लागत नाही. पिंपळाची पाने तर किती सुंदर असतात. हृदयाच्या आकाराची ! जेव्हा नवीन पालवी फुटते तेव्हा ते छान गुलाबी, तांबूस असतात. मग हिरवी होतात. त्यांची सळसळ, वाऱ्यावर डोलणं किती मनमोहक असतं. पिंपळाची पाने, साल आणि मुळे औषधी असतात. पोटाच्या आजारांवर त्यांचा उपयोग होतो. पिंपळ पानांचा काढा आपले शरीर डिटॉक्स करतो म्हणजे त्यातील दोष किंवा टॉक्सिन्स काढून टाकतो. पिंपळाची फळे पक्षांचे आवडते खाद्य आहे. या वृक्षाला अश्वत्थ वृक्ष असेही म्हटले जाते. याचा उल्लेख भगवद्गीतेत सुद्धा येतो. गौतम बुद्धानी याच वृक्षाखाली तप केले. त्यांना त्या ठिकाणी दिव्य ज्ञानाची प्राप्ती झाली म्हणून त्या वृक्षाला बोधिवृक्ष असेही म्हटले जाते. बिहारमधील बोधगया येथे हा वृक्ष आहे. पिंपळाच्या झाडाखाली असलेल्या मारुतीचे म्हणजे अश्वत्थ मारुतीचे दर्शन पुण्यप्रद मानले जाते. श्रावण महिन्यात तर दर शनिवारी पिंपळाची पूजा करतात. पिंपळ वृक्षाचे महत्व सांगणारा एक छान श्लोक आहे. तू आता मी तुम्हाला सांगते. तुम्ही लक्षात ठेवा आणि पाठ करा तो. मूले ब्रह्मा, त्वचा विष्णू , शाखा शंकरमेवच पत्रे पत्रे सर्वदेवायाम, वृक्ष राज्ञो नमोस्तुते. म्हणजे ज्या वृक्षाच्या मुळांमध्ये ब्रह्मा, सालीमध्ये विष्णू, फांद्यांमध्ये भगवान शंकर आणि प्रत्येक पानात देवीदेवतांचा निवास असतो, अशा वृक्षराजाला ( पिंपळाला ) नमन असो.' ' अरे वा, आई किती माहिती आहे ग तुला! आज तर आम्हाला खूप नवीन गोष्टी कळल्या. ' पिंकी म्हणाली. राजेश म्हणाला, ' आई या वडाच्या झाडाभोवती नुसत्या फेऱ्या मारल्या तरी किती छान वाटते. ' श्यामलाताई हसल्या आणि म्हणाल्या, ' तुम्हाला माहिती आहे का की वटपौर्णिमेच्या दिवशी आम्ही याच झाडाची पूजा करतो. त्याला प्रदक्षिणा घालतो. ' पिंकी म्हणाली, ' आई, ते माहितीये, पण का पूजा करतात आणि प्रदक्षिणा का करतात ते सांग ना... ?' श्यामलाताई म्हणाल्या, ' पिंकी तू सावित्री आणि सत्यवान यांची कथा ऐकली असशीलच. तरी मी सांगते. सावित्री ही पतिव्रता होती. यमाने सत्यवानाचे प्राण हरण केले होते. पण सावित्रीने आपल्या सामर्थ्याच्या आणि चातुर्याच्या बळावर यमाकडून त्याचे प्राण परत मागून घेतले. वटवृक्षाखालीच सत्यवानाचे प्राण पुन्हा परत आले. तेव्हापासून सवाष्ण स्त्रिया या वृक्षाची पूजा करतात. आपल्या पतीसाठी दीर्घायुष्याची प्रार्थना करतात. त्याला प्रदक्षिणाही करतात. वडाचे झाड भरपूर ऑक्सिजन देणारे आहे. त्यामुळे त्याच्याभोवती प्रदक्षिणा केल्याने आपोआपच शुद्ध प्राणवायूचा आपल्या फुफ्फुसांना होऊन आपले आरोग्य सुधारण्यास मदत होते. शिवाय वडाची मुळे, साल, पाने औषधी असतात. सांधेदुखीवर त्यांचा चांगला उपयोग होतो. तसेच केस वाढण्यासाठी वडाच्या झाडाचा उपयोग करून तेल बनवतात. कडुलिंबाचे झाड सुद्धा असेच औषधी असते. त्याची सावली तर खूप थंड असते. गुढीपाडव्याच्या दिवशी आपण कडुलिंबाच्या कोवळ्या पानांपासून चटणी बनवतो.

## वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे



## आनंदी पहाट

## मनगटापेक्षा मन घट्ट करणे जरुरीचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पूर्वी एखाद्या रंगाचा पेहेराव केला म्हणून, एखादी विशीष्ट वस्तू सोबत बाळगल्यामुळे, एका विशीष्ट वेळेलाच घराबाहेर कामासाठी पडल्यामुळे अथवा एखादे ठराविक काम ठराविक दिवशीच केल्यानं आपल्याला हमखास भरघोस यशप्राप्ती होते, अन्यथा अपयश, नुकसान, मनस्ताप अटळ आहे; अशा अंधविश्वासाला बळी पडणं ही विवेकी विचारांची उणिव म्हणायची कि विकृती... ? असा प्रश्न पडतो. अशा आठवणी सोबत आपलं केवळ भावनिक नातं निर्माण झालेलं असतं. ह्या भावनिक नात्याचीच झापड आपल्या डोळ्यांवर लावल्यामुळे, आपल्याला सद्यःस्थितीचा आणि वस्तूस्थितीचा विसर पडत जातो. साठवणीतील आठवणींमुळे यशप्राप्ती होते असा विचार, वर्तन करणं म्हणजे अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यासारखंच असतं. वर्तमानात राहून आपल्या कर्तुत्वाच्या आधारे यशप्राप्ती करणं हे सुज्ञपाचं लक्षण असतं. नवनवीन आव्हानं स्वीकारण्याचं धैर्य, कसब, कौशल्य आपल्यात निर्माण होण्याची गरज अधिक असते, हे प्रथम ध्यानात घेतलं पाहिजे.

अनेक गोष्टींचा विचार, वर्तन आणि व्यवहार करताना आपला त्यासंबंधी सखोल अभ्यास होणं आवश्यक असतो. ह्या आभासी दुनियेत स्वप्नवत जगायची सवय लागणं घातक ठरू शकतं. अपयश आणि नैराश्य पदरी आल्यावर दोष मात्र इतरांना, आपल्या नशिबाला, नाही तर मग दैवाला द्यायला सुरुवात होते. डोळ्यावरील भ्रमाची झापडं काढून वस्तुस्थिती, सद्यःस्थिती आणि एकूणच परिस्थितीची जाणीव होणं आवश्यक असतं. आपलं नशीब आपल्या हातावरील रेषांवर अथवा मनगटाच्या जोरावर नाही; तर आपल्या विवेकी आणि सकारात्मक विचारांवर अवलंबून असावं लागतं. विचारच बदलला, तर नशीब बदलतं. पण त्याचा अंगीकार करणाऱ्यांना नेहमीच चांगला प्रत्यय येईल असं नाही, ह्याचं भान राखणं गरजेचं असतं.



आधुनिक केसरी

## वेदना निवारी | जन्माची ह्या ||

आम्ही विष्णुदास | जगी सर्व सुखी ||
वाहतो पालखी | विठ्ठलाची ||१||
नसे आम्हा खंत | भय ह्या काळाचे ||
सोहळे मृत्यूचे | तुका दावी ||२||
दांभिकाच्या परी | बरे हे संसारी ||
नाम्याची पायरी | बळ आम्हा ||३||
खेळतो रिंगण | जनीच्या जात्याचे ||
पीठ अध्यात्माचे | खाद्य आम्हा ||४||
वैष्णवांचे मेळे | दिंडीत भेटले ||
परब्रह्म नाचले | संतांसंगे ||५||
धन्य संतजन | धन्य दिंडी वारी ||
वेदना निवारी | जन्माची ह्या ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

अचिराद्देहि संपत्त्वं समृद्धिं चारुरूपिणि |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं
नमाम्यहम् || ५१ ||
हे चारुरूपिणी, तू मल लवकर
संपदा आणि समृद्धी दे. दारिद्र्यदुःख नष्ट
करण्यासाठी मी दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सर्व काम संसार का,
ज्ञान के पीछे होय ।
बिना ज्ञान धोखा रहे, व्यर्थ कर्म दुख होय
।।१३।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल चतुर्थ अध्याय)
०४/०४/१३
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जगातील सर्व कार्य त्याविषयीच्या ज्ञानानंतरच होतात. ज्ञानाशिवाय केलेले कर्म अंधःकारात होते, ज्यामुळे व्यर्थ दुःख आत्म्यास होते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

..............................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प ३६ वे

आधुनिक केसरी




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

श्रीगुरुंनी प्रेरणा दिली ,लेखणी भारली
कवी अरूणदास लिहीतो चरितावली ।।
रोगी भिकाऱ्याला महाराजांनी घेतले
रामेश्वराचे दर्शनही त्यास घडविले तेथूनि
कांचीस आल्यावरती त्यांनी श्रीवरदराजाचे ही
दर्शन घेतले ।।वरदराज उपासक त्या जोडप्याने
श्रीमहाराजांना आग्रह फार केला कांचीच्या
तीन दिवसांच्या मुक्कामात बाईंचा पारमार्थिक
अधिकार पाहिला ।।लांबलचक भ्रमंती केल्यावरती
श्रीमहाराज येहळेगावाला आले तुकामाईंचे घेतले दर्शन
त्यांनी वर्षाने ते गोंदवल्यास परत आले ।।घरासमोर
श्रीमहाराज म्हणाले घाल माई भिक्षा आज मला, माय,
दे, घट्ट दह्याची दगडी मला हसुनी, आईकडे त्यांनी पाहिले।।।
आईने मुलाला लगेच ओळखले
माझा गणू भेटला, आनंदाने तिच्या डोळ्यांतून अश्रूच हो
वाहू लागले माय -लेक मोठ्या प्रेमाने भेटले ।।

## आधी श्रद्धा, मग कृती, नंतर अनुभव

आधुनिक केसरी

गुरुआज्ञेप्रमाणे वागणाऱ्याला कधीही नड येत नाही. राजाच्या राणीला दुपारी जेवायला कसे मिळेल याची काळजी नसते, तसे, गुरूचा आधार आपल्याला आहे असे ठाम समजणाऱ्याला कसली नड असणार ? लांब उडी घेण्यापूर्वी चार पावले मागे जावे लागते; परिसापाशी सोने व्हायला रुप्याचे लोखंड व्हावे लागते; तसे, गुरूचा पाठीराखेपणा असून आपल्याला जी अधोगतीशी वाटते, ती पुढच्या महत्कार्याची पूर्वतयारीच होय. बाप मुलाला हातावर घेऊन पोहायला शिकवीत असताना मधूनमधून हात काढून घेतो, पण मुलाची खात्री असते, की हा आपल्याला बुडू देणार नाही; तसा आपल्याला सद्गुरूचा आधार आहे अशी आपण पक्की खात्री बाळगावी. आपण आजारी पडलो तर आपणच पैसे देऊन डॉक्टरवर विश्वास, श्रद्धा ठेवतो; औषधाची काही माहिती नसताना ते आपण घेतो. व्यवहारात जर असे आहे, तर मग ' श्रद्धा उत्पन्न झाल्याशिवाय आपण नाम घेणार नाही ' असे म्हणणे बरोबर नाही. डॉक्टरवर विश्वास ठेवतो याचे कारण असे की, आपल्याला जगायची इच्छा आहे; तसे, भगवंताच्या प्राप्तीची तळमळ असेल तर मनुष्य त्याचे नाम घेतल्याशिवाय राहणार नाही. आधी श्रद्धा, मग कृती, आणि नंतर कृतीच्या फलाचा अनुभव, असा व्यवहाराचा नियम आहे. परमार्थामध्ये आपण त्याच मार्गाने जावे. व्यवहारात तुम्ही एकमेकांवर जेवढी निष्ठा ठेवता तेवढी जरी भगवंतावर ठेवलीत, तरी भगवंत तुम्हाला खात्रीने समाधान देईल. आगगाडीत ड्रायव्हरवर विश्वास ठेवून आपण स्वस्थ झोप घेतो, त्याचप्रमाणे भगवंतावर श्रद्धा ठेवून काळजी न करता आपण स्वस्थ रहावे. ड्रायव्हरपेक्षा भगवंत नक्कीच श्रेष्ठ आहे. परमार्थात अंधश्रद्धेची मुळीच गरज नाही, पण तिथे श्रद्धेशिवाय मात्र मुळीच चालायचे नाही. सांगणारा कसाही असला तरी ऐकणाऱ्याची जर खरी श्रद्धा असेल, तर त्या श्रद्धेनेच त्याच्या अंगी पात्रता येईल. संतांच्या सांगण्यावर पूर्ण श्रद्धा ठेवावी. अशी श्रद्धा असणे ही फार भाग्याची गोष्ट आहे. खरे म्हणजे अशी श्रद्धा ज्याला लाभली, तो लवकर सुखी झाला. आज आपल्यापाशी ती नाही, तर निदान आपण स्वतःशी प्रामाणिक बनू या. आधी पुष्कळ चिकित्सा करून आपले ध्येय ठरवावे, पण एकदा ते ठरले की मग निश्चयाने आणि श्रद्धेने त्याच्या साधनात राहावे. आपण परमात्म्याजवळ मागावे की, " तू वाटेल त्या स्थितीत मला ठेव, पण माझे समाधान भंगू देऊ नकोस. माझा मीपणा काढून टाक. तुझा विसर पडू देऊ नकोस. मला अमुक एक तुजजवळ मागावे अशी इच्छा देऊ नकोस. नामामध्ये प्रेम दे, आणि तुझ्या चरणी दृढ श्रद्धा सतत टिकू दे. आजचे बोधवचन आहे-२०५. श्रद्धेशिवाय कधी कोणाला परमार्थ साधायचा नाही.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

संताच्या संगतीत आपल्या मनावर जो परिणाम होतो, त्यावरून आपण संताची परिक्षा करावी. माझे चित्त जिथे निर्विषय होईल तिथेच संताची खरी जागा म्हणता येईल. ज्याला भगवत्प्राप्तीची तळमळ लागली आहे, त्यालाच शिष्य म्हणावे. जो गुरूआज्ञेबाहेर जात नाही, आणि गुरू हेच भगवंतप्राप्तीचे साधन मानतो, तो सच्छिष्य होय. गुरूपरता देवधर्मच नाही मानू.

गुरु कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कोठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहात असतील, दुसरा कोणी आणखी कोणत्या गावी राहात असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. क्रमशः

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अन्यायोपार्जितं वित्तं दश वर्षाणि तिष्ठति ।प्राप्ते चैकादशे वर्षे समूलं च विनश्यति ॥
स्पष्टीकरण - अन्यायाने, अनीतीने धन मिळवू नये. ते फार काळ टिकत नाही. जेवढा काळ टिकते तेवढया काळातही मनाला शांती देत नाही. सतत कसली तरी भीती, कसली तरी अस्वस्थता जाणवत राहते. शेवटी द्रव्य तर जातेच; पण पाप मात्र आपल्या माथी कायमचे बसते. त्या धनामुळे जडलेली व्यसनेही सुटत नाहीत. एतावता सगळा अधःपात !

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी


विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, २७ जुलै २०२३




कै.डॉ.दभी. कुलकर्णी एक साहित्य परिस स्पर्श

पान ६



संतांच्या मते शाश्वत सुख कोणते ?

पान ७

## प्रासंगिक



# कर्तव्यनिष्ठ आमदार कामगिरी दमदार

## *आ. अमित झनक यांची सभागृहात लक्षवेधी कामगिरी*

जे लोकप्रतिनिधी राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त महत्त्व देतात तेच खऱ्या अर्थाने निवडून देणाऱ्या लोकांच्या विश्वासहर्तेला पात्र ठरतात. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीतील काही वर्षांचा अपवाद वगळता, पूर्वीच्या मेडशी विधानसभा मतदारसंघापासून आजच्या रिसोड, मालेगाव विधानसभा मतदारसंघावर रिसोड तालुक्यातील मांगुळ झनक येथील झनक घराण्यातील तिसऱ्या पिढीच्या रूपाने युवा आमदार अमित झनक हे, आपल्या झनक घराण्याची कर्तव्यनिष्ठेची परंपरा जोपासत आहेत. केवळ आपल्या मतदार संघातच नव्हे; तर संपूर्ण वाशिम जिल्ह्यात सामाजिक समस्या सोडविण्यात अग्रस्थानी आहेत. त्यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात जिल्ह्यातील अनेक महत्त्वपूर्ण समस्यांच्या व्यथा सभागृहात मांडून, लक्षवेधी कामगिरी केली आहे. त्यामुळे त्यांच्या या कामगिरीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधले असून, " कर्तव्यनिष्ठ आमदार कामगिरी दमदार " असे म्हणत जिल्हावासी युवा आमदार अमित झनक यांचे कौतुक करीत आहेत.



वसंत खडसे
9373578429

आमदार अमित झनक यांनी अधिवेशना दरम्यान सभागृहात उपस्थित केलेले महत्त्वपूर्ण मुद्दे हे वास्तवाला धरून असल्यामुळे, सभागृहात लक्षवेधी ठरले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने वाशिम येथे नियोजित असलेल्या केंद्रीय महाविद्यालयाचा मुद्दा व त्यासाठी जागा उपलब्धते बद्दल येणाऱ्या विविध अडचणी आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी शासन दरबारी केलेली आग्रही विनंती, ही आमदार झनकांच्या कर्तव्यनिष्ठेची पावती ठरत आहे. याशिवाय, जिल्ह्यात रेती उपशावर लागू असलेला प्रतिबंध, त्यामुळे जिल्ह्यात रेतीचा तुटवडा भासत असल्याने गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांची होत असलेली अडगळ, हा मुद्दा अत्यंतिक पोटतिडकेने मांडून समाजातील अखेरच्या घटकापर्यंत असलेला दृष्टीक्षेप आमदार अमित झनकांनी सिद्ध केला आहे. शेतकऱ्यांच्या समस्या बाबत सभागृहात बोलताना वन्यप्राण्यापासून शेतकऱ्यांच्या पिकांची होणारी नासधूस, त्यापासून शेतकऱ्यांना सोसावा लागणारा त्रास, त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासंबंधी केलेली विनंती तद्वतच, अतिवृष्टीने खरडून गेलेल्या जमिनी व प्रभावित क्षेत्रात विस्कळीत झालेले जनजीवन, पूर्ववत करण्यासाठी तातडीने मदत करण्याची केलेली मागणी आदी, मुद्दे उपस्थित करून आपल्या झनक घराण्याला लोकांनी बहाल केलेली " बळीराजा " ही उपाधी योग्य असल्याचे पुन्हा एकदा युवा आमदार अमित झनक यांनी शिक्कामोर्तब केले आहे.

आ. झनक यांच्या घराण्यात गेल्या तीन पिढ्यांपासून आमदारकी असून, त्यांचे वडील लोकनेते स्व. सुभाषरावजी झनक हे मा. मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री होते, सदोदीत हसतमुख चेहरा व सर्वांना आपलेसे करून घेण्याची त्यांची हातोटी आणि विरोधक का असेना..! पण, त्याची ज्वलंत असलेली समस्या पोटतिडकेने सोडविण्याची त्यांची खुबी हे सर्व गुण आ. अमित झनक यांच्यात दिसत असल्याचे जिल्ह्यातील अनेक अनुभवी ज्येष्ठ राजकारणी बोलत आहेत.

# सीएसएमएसएस कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून उत्कृष्ट मानांकन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (M.S.B.T.E) मुंबईकडून उत्कृष्ट दर्जा (Excellent Remark) देऊन गौरव करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, शंकाचे समाधान, निकालाची उज्ज्वल परंपरा, नामांकीत उद्योगांना भेटी, तज्ञ पाहुण्यांचे व्याखाने, सेमिनार यांचे नियमित आयोजन, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष दिले जाते.


या सर्व बाबींमुळे सर्व शाखांना उत्कृष्ट दर्जा देऊन M.S.B.T.E. चे संचालक डॉ. प्रमोद नाईक व सचिव डॉ. महेंद्र चितलांगे यांनी लेटर ऑफ अँप्रीशिएशन देऊन गौरव करण्यात आला. यशाबाबत छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.रणजीत मुळे व सचिव श्री. पद्माकरराव मुळे यांनी सर्वांचे अभिनंदन करून भविष्यात विद्यार्थ्यांना उत्कृष्ट ज्ञानदानाचे कार्य सुरु राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

तंत्रशिक्षण क्षेत्रात कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक खूप प्रगती करत आहे. विशेष बाब म्हणजे महाविद्यालयातील सर्व सहा कोर्सेसना उत्कृष्ट दर्जा देऊन गौरविण्यात आले आहे. यामध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग यांना यापूर्वीच उत्कृष्ट दर्जा देऊन गौरविण्यात आले असून यावर्षी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, इलेट्रॉनिक्स अँण्ड टेलीकॉम इंजिनिअरिंग सोबतच नवीन सुरु झालेल्या आर्टीफिसिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता उत्कृष्ट दर्जा देऊन गौरविण्यात आले. कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमध्ये महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई व तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या निर्देशानुसार वेगवेगळे उपक्रम यशस्वीपणे राबविले जातात व आधुनिक तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे ओळख व्हावी व त्याचे सखोल ज्ञान मिळावे. यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते. उज्ज्वल निकालाच्या परंपरेसोबत नामांकित आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील कंपन्यांमार्फत प्लेसमेन्ट केले जाते व त्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नोकरी उपलब्ध करून दिली जाते. दरवर्षी सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केले जाते व याद्वारे विद्यार्थ्यांना नोकरी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये बजाज ऑटो लि., जॉन डियर इंडिया प्रा. लि., फोर्ब्स अँड कंपनी लि., मॅसो ऑटोमोटिव्हस प्रा.लि., व्हॅरॉक इंजिनीअरिंग प्रा. लि., गंगामाई इंडस्ट्रीज अँड कन्स्ट्रक्शन्स लि. सारख्या नामांकित कंपन्यामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सुमारे २.२५ लाखाहून अधिक वार्षिक पॅकेज दिले आहे. अशी माहिती कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी दिली आहे.

CSMSS कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकला मागील १४ वर्षाची यशस्वी परंपरा असून आजपर्यंत ४०० हुन अधिक विद्यार्थी विविध नामांकित उद्योगांमध्ये नोकरी करत आहेत. उच्च शिक्षित प्राध्यापकवृंद, आधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशा प्रोयोगशाळा तसेच बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून योग्य प्रशिक्षण व जास्तीत जास्त प्रात्यक्षिकांचा सराव करून घेतला जातो.असे प्रतिपादन सचिव श्री. पद्माकरराव मुळे यांनी केले.

या यशाबद्दल छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.रणजीत मुळे, सचिव श्री. पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी, डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, उप-प्राचार्य प्रा. चंद्रशेखर राहणे, अकॅडेमिक इन्चार्ज प्रा. कैलास तिडके, प्रा. हरिष रिंगे, प्रा. रुपाली पोफळे, प्रा. माधव नरंगले, प्रा. संदीप मदन, प्रा. सोनल बोराखडे, टी. पी. ओ. प्रा. सागर आव्हाळे, प्रा. गिरिष सहाणे यांनी शुभेच्छा दिल्या.

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर ....**



प्रत्येक विद्यार्थ्याला योग्य प्रकारे प्रशिक्षित करून तसेच व्यवसाय अथवा नोकरी मिळवून देण्यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते . विद्यार्थ्यांचा शैक्षणिक तसेच व्यक्तिमत्व विकास, सॉफ्टस्किल डेव्हलपमेंट, अभियोग्यता चाचणी अशा विविध चाचण्या घेण्यात आल्या असून हे विद्यार्थी सर्व टप्प्यांवर यशस्वी झाले आहेत .कॅम्पसमध्ये बसची व्यवस्था, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, कॅन्टीन, हॉस्पिटल, एटीएम, पोस्ट ऑफीस, मेडिकल सुविधा उपलब्ध आहेत . कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचा उत्कृष्ट दर्जा देऊन गौरव करण्यात आला आहे . भविष्यातही अशीच वाटचाल सुरु राहील .

**रणजीत मुळे, अध्यक्ष , छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था**

# वरोरा तालुक्यातील मृत युवकांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून अर्थसाहाय्य द्या : आ. धानोरकर

## त्वरित निधी देण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांचे निर्देश



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** घोडाझरी तलावात बुडून वरोरा तालुक्यातील चार युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हि घटना अतिशय वेदनादायी असून या कुटुंबियांना विशेष बाब तत्वावर मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत करण्याची लोकहितकारी मागणी आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. मुख्यमंत्र्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देत त्वरित निधी देण्याचे आदेश दिले.

वरोरा तालुक्यातील शेगाव येथील मनीष श्रीरामे, धीरज झाडे, चेतन मांदाडे व गिरोला येथील संकेत मोडक असे मृतक युवकांची नावे आहेत. काही दिवसाआधी आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना आर्थिक सहकार्यकरीत सांत्वन केले होते. अधिकची मदत त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मिळण्याकरीता आमदार प्रतिभाताई धानोरकर ह्या प्रयत्न करीत आहेत. त्वरित हि मदत मिळाल्यास मृतकाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळेल.

सद्या पावसाळा सुरु असून पावसाळ्यात जिल्ह्यात अनेक ठिकाणी युवक फिरायला जात असतात. परंतु त्यांनी पावसाचा आनंद घेत असतांना अधिक जोखिमेचे पाऊल उचलू नये, असेही आवाहन आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केले आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यात वीज कोसळून दोन जण ठार

## विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हातील गोंडपिपरी, ब्रम्हपुरी तालुक्यात विज कोसळून दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. शेतातून परत येत असताना विज कोसळल्याने शेतमजूर महिला दगावली तर वनविभागाचा कामावर असलेल्या वनमजुराचा विज कोसळल्याने मृत्यू झाला आहे. गीता पुरुषोत्तम ढोंगे, गोविंदा लिंगा टेकाम अशी मृतकांची नावे आहेत.

चंद्रपूर शहरात आज ( बुधवारी ) धो धो पाऊस बसरला. जोरदार वादळी वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसामुळे



एकच दाणादाण उडाली.सलग दोन तास पडलेल्या मुसळधार पावसामुळे शहरात अनेक भागात पाणी साचले.तर जिल्हातील अनेक भागात विजाचा कडकडासह पाऊस झाला. वीज अंगावर कोसळल्याने जिल्ह्यात दोन दुर्दैवी घटना घडल्या आहेत. ब्रम्हपुरी तालुक्यातील बेटाळा येथील गीता ढोंगे ही महिला शेतकामे आटोपून घराकडे निघाली होती. दरम्यान तिच्या अंगावर विज कोसळली. वीज कोसळल्याने घटनास्थळीच गीताचा मृत्यू झाला. मृतक महिलेच्या मागे पती, दोन मुली, सासू असा आप्तपरिवार आहे. या घटनेने गावात शोककळा पसरली आहे. दुसरी घटना गोंडपिपरी तालुक्यातील आहे.चिवंडा या गावातील गोविंदा टेकाम हे वन विभागाचा कामावर होते. जंगलात वृक्ष लागवड सुरु होती. वृक्ष लागवड करीत असतानाच गोविंदा टेकाम यांच्या अंगावर विज कोसळली. विज कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या दोन घटनानी जिल्हात शोककळा पसरली आहे.


आधुनिक केसरी

द्वितीय वर्धापनानिमित्त हार्दिक शुभेच्छा



एक शुभेच्छुक

## सरकारची सुप्रीम कोर्टात धाव

आधुनिक केसरी

केंद्र सरकारने पुन्हा एकदा सक्तवसुली संचालनालयाचे संचालक संजय कुमार मिश्रा यांचा कार्यकाळ वाढवावा या मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यावर सुप्रीम कोर्ट 27 जुलै रोजी सुनावणी करणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार एसके मिश्रा यांचा ईडी संचालक म्हणून कार्यकाळ 31 जुलै रोजी संपणार आहे. संजय कुमार मिश्रा यांचा कार्यकाळ वाढवू नये असे आदेश सुप्रीम कोर्टाने 2021 मध्येच दिली होते. त्यानंतर देखील कायदा आणत मुदत वाढवण्यात आली होते. 31 जुलैपर्यंत मिश्रा हे ईडीचे संचालक म्हणून काम पाहता येणार आहे. या दरम्यान, केंद्र सरकारने नवीन ईडी संचालकांची निवड करावी असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. तसेच त्यांचा कार्यकाळ वाढवणे हे बेकायदेशीर असल्याचे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. त्यानंतर देखील आठवडा बाकी असताना केंद्राने पुन्हा सुप्रीम कोर्टात मागणी केली आहे. आता यावर सुप्रीम कोर्ट 27 जुलैला आपला निर्णय देणार आहे. सुप्रीम कोर्ट उद्या काय निर्णय देते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. संजय कुमार मिश्रा यांचा कार्यकाळ वाढवू नये असे आदेश सुप्रीम कोर्टाने 2021 मध्येच दिली होते. त्यानंतर देखील कायदा आणत मुदत वाढवण्यात आली होते. 31 जुलैपर्यंत मिश्रा हे ईडीचे संचालक म्हणून काम पाहता येणार आहे. या दरम्यान, केंद्र सरकारने नवीन ईडी संचालकांची निवड करावी असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. तसेच त्यांचा कार्यकाळ वाढवणे हे बेकायदेशीर असल्याचे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. त्यानंतर देखील आठवडा बाकी असताना केंद्राने पुन्हा सुप्रीम कोर्टात मागणी केली आहे. आता यावर सुप्रीम कोर्ट 27 जुलैला आपला निर्णय देणार आहे. सुप्रीम कोर्ट उद्या काय निर्णय देते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. संजय कुमार मिश्रा हे ईडीचे संचालक म्हणून 2018 साली नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा कार्यकाळ हा 2020 मध्ये समाप्त होणार होता. मात्र, केंद्र सरकारने त्यांना एक वर्षाची सेवा मुदत वाढ दिली. स्वयंसेवी संस्था 'कॉमन कॉज'ने सुप्रीम कोर्टात या मुदतवाढीला आव्हान दिले होते. 8 सप्टेंबर 2021 मध्ये सुप्रीम कोर्टाने म्हटले की, मिश्रा यांचा विस्तारीत कार्यकाळ 18 नोव्हेंबर रोजी संपणार आहे. त्यामुळे आता दखल दिली जाणार नाही. मात्र, त्यांचा कार्यकाळ या पुढे वाढवण्यात येऊ नये असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले होते. संजय मिश्रा यांना 19 नोव्हेंबर 2018 मध्ये दोन वर्षांसाठी ईडीचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. नोव्हेंबर 2020 मध्ये मिश्रा पदमुक्त होणार होते. त्याआधीच मे महिन्यात त्यांनी वयाची 60 वर्ष पूर्ण केली. याचा अर्थ त्यांनी निवृत्तीचे वय गाठले. नोव्हेंबर 2020 मध्ये त्यांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधी त्यांचा कार्यकाळ दोनऐवजी तीन वर्षांचा करण्यात आला. त्यानंतर केंद्र सरकारने नोव्हेंबर 2021 मध्ये केंद्रीय दक्षता आयोग (सीव्हीसी) अधिनियम अंतर्गत एक सुधारणा अध्यादेश जारी केला. त्यानुसार, संजय मिश्रा यांचा कार्यकाळ 18 नोव्हेंबर 2023 रोजी संपणार होता. आता, त्याआधीच सुप्रीम कोर्टाने ही सुधारणा रद्द केली आहे.

## मणीपूर पेटत आहे ; वाचवावं लागेलच



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**मणीपूर... भारताचा एक अविभाज्य भाग. या राज्याचे क्षेत्रफळ २२,३२७ किमी आहे. तशीच लोकसंख्या २७,२१,७५६ एवढी आहे. या राज्यात अनेक जातीचे व धर्माचे लोकं राहतात. ज्यात कुकी, जोमी व मतैई या समाजाचाही समावेश आहे. तसंच ज्यात मैतेई हे अल्पसंख्याक लोकं राहतात की जे स्वतःला उच्च समजतात आणि कुकी व जोमी या जातींना कनिष्ठ. मणीपूर भारत देशात इशान्य भागाला वसलेलं राज्य आहे. या राज्याच्या लगत उत्तरेस नागालँड, पश्चिमेस आसाम, पूर्वेस म्यानमार व दक्षिणेस मिझोराम आहे. इंन्फाळ ही मणीपूरची राजधानी आहे. मणीपुरी ही येथील भाषा असून येथील साक्षरता चांगलीच म्हणजे ७९.८५ आहे. तरीही या राज्यात बलात्काराची घटना होते आणि या घटनेवर उत्तर हे बलात्कारानच दिल्या गेलं आहे. म्हणूनच हे हिंसक वातावरण. मात्र हिंसक वातावरण निर्माण होण्यापुर्वी इथे बलात्कार झाला की नाही झाला?**

झाला तर त्याला हिंसक रुप देण्यापुर्वी त्याची तक्रार पोलीस स्टेशनला का केली नाही ? कदाचीत तो कथीत तर बलात्कार नाही ? असे अनेक प्रश्न आहेत. ज्याची उत्तरं आजही सापडलेली नाही. परंतु तरी आजही तेथे हिंसक वातावरण सुरुच आहे आणि त्याचे पडसाद पुर्ण भारतात उमटत आहेत. स्त्रियांच्या इज्जती वेशीवर टांगलेल्या असून त्यांना हात बांधून व डोळे बांधून मारले जात आहे. तसेच तुम्हीच कपडे काढा. नाहीतर मारुन टाकू असाही दम दिला जात आहे. बलात्कार तर रोजचाच आहे. कधी या जातींचा तर कधी त्या जातींचा.

पुर्वी मणीपूर हे एक संस्थान होते. १९३० ला मणीपूर राज्याने ब्रम्हदेशाचा भाग होण्याऐवजी भारताचा भाग होणं स्विकारलं. त्यासाठी लोकांनी संस्थानीकांवर दबाव आणला. हा लढा सन १९३९ नंतर अधिक तीव्र करण्यात आला व ११ ऑगस्ट १९४७ ला राजा बुधचंद्र याने भारतात सामील होण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. त्यानंतर २१ सप्टेंबर १९४९ ला विलीनीकरण स्वाक्षरी झाली व मणीपूर हे भारताचा भाग बनले. परंतु हे विलीनीकरण काही लोकांना मान्य नव्हते. त्यामुळंच सत्तासंघर्ष सुरुच राहिला.

मणीपूरी लोक इथं जास्त म्हणजे ५३ टक्के आहेत. नागा जाती २४ टक्के व कुकी जमाती १६ टक्के आहेत. उरलेले सात टक्के लोकं बाकीचे आहेत. यामध्ये निव्वळ आदिवासी समुदाय ४१ टक्के आहे. तसंच लगतच्या मिझोराम राज्याशी या राज्याचे मित्रत्वाचे संबंध आहेत. तशीच कुकी आणि जोमी जनजातीशी त्यांची रिश्तेदारीही आहे.

मणीपूरात हिंसा भडकण्याचं तात्कालिक कारण असं. गत काही दिवसापुर्वी इथं दोन बलात्कार झाले. त्यात दोन महिलांना निर्वस्त्र करुन फिरविण्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर सामुहिक बलात्कार केल्या गेला व तो बलात्कार का केला ? असं विचारलं असता कारण सांगण्यात आलं की यांनी आमच्या समुदायातील एका महिलेवर आधी बलात्कार केलेला आहे. त्यामुळंच आम्ही बलात्कार केलाय.

घटना अशी. तो ४ मे चा दिवस. तो कांगपोकपी जिल्हा. त्या दिवशी त्या जिल्ह्यातील एका गावात अचानक जमावानं हमला केला. त्यानंतर त्या जमावातील तीन महिला व दोन पुरुष भयभीत होवून जंगलात पळाले. परंतु जमाव एवढ्यावरच थांबला नाही. त्या जमावातील काही लोकांनी या पाचही जणांचा पाठलाग केला. त्यातच पोलीसही त्यांना वाचविण्यासाठी त्यांच्या मागावर होते. हे पाचही जण जंगलात पळून जाताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं व संरक्षण दिलं. परंतु पोलिसांची ताकद कमी पडली व या जमावानं पोलिसांच्या ताब्यातून या पाचही जणांना ताब्यात घेतलं व त्यातील दोन पुरुषांची हत्या केली. जमाव एवढ्यावरच थांबला नाही तर त्यांनी दोन महिलांना निर्वस्त्र केलं. त्यांना निर्वस्त्र स्वरुपात फिरवलं. त्यावेळेस त्यांनी दयेची भीक मागितली. परंतु जमावानं ते ऐकलं नाही व त्यानंतर त्यांच्यावर एका मागोमाग एक असा सामुहिक बलात्कार केला. त्यानंतर त्यांची नृशंन्स हत्याही केली. तसाच त्या घटनेचा व्हिडिओही बनवला. म्हणतात की ही घटना पुर्वीच घडून गेली व व्हिडिओ नंतर व्हायरल केल्या गेला. ही घटना यासाठी करण्यात आली असावी. कदाचीत लोकांवर आमच्या समुदायाबद्दल धाक निर्माण व्हावा व कोणताही आदिवासी समुदाय आमच्या वाट्याला जावू नये हे या घटनेमागील राजकारण. सत्य काय आहे हे मणीपूरच्याच जनतेला माहीत. म्हणतात की यात तीन महिला होत्या. परंतु एक महिला व्हिडीओत दिसत नाही. त्यानंतर जसा हा व्हिडिओ व्हायरल झाला. तसे घटनेचे पडसाद उमटले. त्यानंतर या घटनेनं केवळ आदिवासीच नाही तर संपूर्ण भारत देशातील नागरीक खवळले. शोक व्यक्त झाले. कात्र्या लावल्या गेल्या. परंतु जमाव पांगेल तेव्हा ना. ना कुकी व जोमी जमातीची मंडळी ऐकत आहेत. ना मणीपूरमधील इतर जातीचे लोक ऐकत आहेत. यात मिझोराम या लगतच्या राज्याचा काहीही दोष नाही. ना तेथील मैतेही लोकांचा. तरीही मिझोराम राज्यातील पीस अकॉर्ड एम एन एफ रिटर्नीज एसोसिएशन PAMRA या उग्रवादी संघटनेने येथील मैतेई लोकांना धारेवर धरले आहे. जे अल्पसंख्याक असून त्यांची मिझोराममधील संख्या फक्त दोनहजार आहे. म्हणतात की आता या सामुहिक बलात्काराच्या घटनेत मिझोराममधील लोकांशी असलेले मणीपूर मधील कूकी व जोमी या जमातीचे हितसंबंध कारणीभूत आहेत. आता या मिझोराम मधील बरेचसे मैतेई लोकं आसाममध्ये स्थलांतर करीत आहेत. या घटनेचं तात्कालिक कारण असं की त्यांना PAMRA या उग्रवादी संघटनांनी एक धमकीच दिली की जर आपण मिझोराम मध्ये दिसाल तर एक एक निवडू निवडू मारु. मग आम्ही विचारही करणार नाही. त्यामुळंच की काय मिझोराममध्ये राहणारे हे मैतेई अल्पसंख्याक लोकं आसाम या लगतच्या राज्यात स्थलांतर करीत आहेत. ज्यात विद्यार्थी व प्रोफेसर सुद्धा आहेत. तसेच मणीपूर मध्ये राहणारे मिझोराम वर्णीय लोकं मिझोरामला स्वगृही परतत आहेत.

वर्गसंघर्ष...... जातसंघर्ष....... धर्मसंघर्ष ....... ह्या पुर्वापार चालत आलेल्या गोष्टी. ही किडच लागली आहे काही लोकांच्या विचारांना. सडक्या मेंदूत लागलेली सडकी किड. कोणता चांगला विचार प्रसवणार ही सडकी किड. काही लोक असेच सडक्या विचारांचे असतात. तेच सडके विचार प्रसवतात व त्या विचारांचा प्रसार करतात. ज्यात चांगलेही फसतात व तेही बळी ठरतात. त्यामुळं अशा घटनांना किंबहुना थांबविता येणे शक्य नाही. वर्चस्वाच्या लढाईतून हे घडत असलेलं कृत्य. त्यांना कधी चांगलं सुचनारच नाही.

धर्म जाती आणि वर्ग. आपल्या आपल्या ठिकाणी बरोबर आहेत. हो, धर्म वाढवा ना. कुणी अडवलं, कुणी मनाई केली ? जात जोपासा ना. कुणी मनाई केली ? धर्माचा व बलात्काराचा संबंध नाही. जातीचा व बलात्काराचा संबंध नाही. बलात्कार करणारा हा काही कोणत्याही धर्माचा वा जातीचा वा वर्णाचा होवू शकत नाही. तरीही कथीत बलात्कार सादर करुन मणीपूर काही तुरळक सडक्या विचारांच्या माणसांनी पेटवला आहे व त्याला जातीय रंग देवून कुकी व जोमी जातीच्या स्त्रियांवरच बलात्कार केले आहेत व करीत आहेत. त्यातच कुकी व जोमी जमातीचेही समुदाय कमजोर नाहीत. तेही बलात्काराचा बदला बलात्कारानेच घेत आहेत. स्त्रिया तर अशा दोन्ही समुदायांची कळसुत्री बाहूली ठरलेली आहे. त्यातील पुरुषही मारले जात आहेत आणि त्याचा व्हिडिओही व्हायरल केला जात आहे नव्हे तर याला जातीचा रंग अगदी हुबेहुब मारला जात आहे की मणीपूर पेटत राहावं व त्याचबरोबर आजुबाजूचे राज्य. तसाच संपूर्ण भारत देशही पेटावा अशीच चिन्हं दिसत आहेत. म्हणजेच आपल्याला मजा येईल. आपली पोळी भाजता येईल. असा देखावा. अगदी चित्रपटाला शोभेल असंच कथानक. मुळात असा हा जातीय संघर्ष आज मणीपूरातच नाही तर आजपर्यंत देशात कित्येक ठिकाणी पाहिला. तसाच बराचसा धर्म संघर्षही देशानं अनुभवला आहे आणि अनुभवत आहे.

महत्वाचं सांगायचं म्हणजे खरंच मणीपूर असा जातीय दंगलीनं पेटावा का ? आपण पेटू द्यावा का ? भारत माझा देश असतांना व सारे भारतीय माझे बांधव असतांना त्या ठिकाणच्या स्त्रिया आपल्या आपल्या भगिनी नाहीत का ? कशाला हवेत असे जातीय संघर्ष आणि असे धर्मसंघर्ष ? कशाला हवा असा हिंसाचार ? यानं काय आनंद मिळतो का ? अन् ज्याला आनंद मिळत असेल, त्याच्यासारखा कोणी मुर्ख नाही व त्याला या देशात राहण्याचाही काही अधिकार नाही. कारण हा देशच मुळात गौतम बुद्धाच्या विचाराचा आहे. ज्यांच्या विचारानं प्रेरीत होवून सम्राट अशोकांनी कलिंग युद्धानंतर हिंसेला पूर्णविराम दिला. हा देश म. गांधीच्या विचारांचा आहे. ज्यांनी विना शस्त्राविणा देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं. हा देश त्या लोकांच्या विचारांचा आहे की ज्यांनी हसतहसत फाशी घेतली. परंतु विरोध वा हिंसा केली नाही वा हिंसक वातावरण तयार केले नाही. बलात्काराचा बदला बलत्कारानच घेतला नाही. स्त्रियांना कधीच कळसुत्री बाहुली बनवून छळलं नाही. त्यामुळं मणीपूरच्या जनतेला विशेष सांगायचं म्हणजे हिंसा करण्यापुर्वी आठवा त्यांना की जालियनवाला बागेत जनरल डायरच्या गोळ्यांचे भारतीय लोकं शिकार झाले होते. परंतु तरीही हिंसा घडवली नव्हती वा कोणावर बलात्कार केले नव्हते. मग आजच का गरज येवून पडली ? हिसेचा बदला हिंसा आणि बलात्काराचा बदला बलात्कारानं घेण्याची आणि असंच जर सुरु राहिलं तर आज मणीपूर पेटत आहे, उद्या देश पेटेल, यात शंका नाही.

विशेष सांगायचं म्हणजे मुळात आज हिंसा बंद व्हावी. मणीपुरातीलच नाही तर संपुर्ण देशातील. नाही तर उद्या या देशाला काहीच अर्थ उरणार नाही व हा देश कधी कोणाचा गुलाम होईल हेही सांगणे कठीण जाईल. कारण राज्य वा देश बुडायला आपसातील वादच कारणीभूत असतात हे आपण आपल्या पुर्वजांपासूनच अनुभवलं आहे. तसा इतिहास आपण शिकलेलो आहोत. हे आपण आठवायला हवं. आपण स्वतंत्र्य आहोत तर खरंच सुखी आहोत. पारतंत्र्यात असं सुख मिळणार नाही हे तेवढंच खरं. म्हणूनच याच अनुषंगाने मणीपुरातीलच नाही तर देशातील समस्त बांधवांना माझं एवढंच म्हणणं की पुरे झाला संघर्ष आणि जातीयवाद. आतातरी जातीयवाद व संघर्ष सोडा व संघर्षाची आग कायमची विझवा. त्यातच सर्वांचं भलं आहे. नाहीतर या देशाची राखरांगोळी व्हायला वेळ लागणार नाही. हेही कोणीच विसरु नये.

## फिजुल गोष्टींवर खर्च करण्यासाठी नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**उर्जा ही जीवनातील अनमोल शक्ति असुन आपण ही शक्ति ज्या पद्धतीने वापरतो त्या प्रमाणेच परिणाम आपल्याला अनुभवायला मिळत असतात. उर्जेचा वापर आपण कसा करतोय यावर बरंच काही अवलंबून असत. योग्य वापर उचित परिणाम अयोग्य वापर अनुचित परिणाम हे जवळपास निश्चित सुत्र आहे. दैनंदिन जीवनात आपली उर्जा हि क्षुल्लक कारणासाठी खर्च होऊन आपल नुकसान होणार नाही याची काळजी दक्षता घेतली गेलीच पाहिजे. त्यासाठी आपला विवेक हा सदैव सचेत आणि जागृत ठेवलाच पाहिजे. मुख्यत्वे उत्कृष्ट आणि सर्व श्रेष्ठ कार्यावर आपली उर्जा खर्च होण अपेक्षित असते जेणेकरून जीवनाचा उत्कर्ष होईल .पण आपण अंहकाराच्या चक्रव्युहात अडकतो व आपली उर्जा नाहक नको तिथे खर्च करून आपलं नुकसान करून घेतो . वेळ काळ प्रसंग समजला पाहिजे आणि तो समजला नाही तर मग मात्र आपण नको तिथे आपला विवादात पडतो. जीवनातील कोणत्या टप्प्यावर कोणाच्या आणि कशासाठी नादी लागयच हे अगोदर समजलं पाहिजे.**

धक्काधकी च्या जीवनात वादाच कारण क्षुल्लक नसलं पाहिजे. क्षुल्लक कारणासाठी वाद घालुन आपली उर्जा व्यर्थ घालवण हे कधीच परवडणार नसतं . आपल्याला जीवनात मिळालेली उर्जा ही आयुष्याला योग्य दिशा देऊन सर्वोच्च यशोशिखरावर गाठण्यासाठीच असते .याची जाणीव ठेवली तर आपला मार्ग चुकत नाही. आपण यशाच्या मार्गावर दिशेने मार्गस्थ असताना अनेक छोटे-मोठे गतिरोधक येण हे स्वभाविक आहे.पण हे सर्व गतीरोधक पार करताना आपण आपली विनम्रता वापरून मार्ग काढण आवश्यक आहे.मान, अपमान ,सन्मान हि जीवनातील गौण बाब असते .आपलं मन आणि अंतःकरण उदार असलं पाहिजे. जेणेकरून किरकोळ कारणावरून संघर्ष करण अथवा वाद विकोपाला घेऊन जाणं हे कधीच लाभदायी ठरत नाही. म्हणून आपल्या शरिरातील उर्जा ही सर्व श्रेष्ठ उत्कृष्ट अशा बाबींवर खर्च करून त्या अनुषंगाने सुयोग्य परिणाम काढण्यासाठी मिळालेली अद्भुत शक्ती असते .हि शक्ती आपण ज्या पद्धतीने वापरतो त्या पद्धतीने त्याचे परिणाम आपल्याला अनुभवायला येत असतात.मुळात उर्जा हि शक्ती असुन हि शक्ती लोक हितार्थ अथवा स्व हितार्थ ठरली पाहिजे. आपली उर्जा हि व्यर्थ अथवा फिजुल गोष्टीवर खर्च करण अजिबात व्यवहार्य नसतं पण आपला अंहकार अडावा येतो.आणि आपण नको तिथे नको तितक डोकं लावतो .आपली उर्जा हि सर्व श्रेष्ठ कार्यावर खर्च झाली तर त्याची फलनिष्पत्ती देखिल ऐतिहासिक होत असते.हे उमजलं नाही तर मग मात्र चिल्लर चिल्लर बाबींवर उर्जा व्यर्थ खर्च करून आपण आपलं व्यक्तिमत्त्व सुद्धा त्याच पद्धतीचे घडवतो .दैनंदिन जीवनात असे काही छोटे छोटे प्रसंग येत असतात ज्यामुळे आपल्याला मान सन्मान, अथवा आपमान या पैकी एकाला सामोरे हे जावेच लागते .पण त्या मध्ये आपलं असं काही मोठं हित अथवा उत्कर्ष अजिबात नसतो तरी देखील आपण नादी लागतो छोट्या गोष्टी अथवा बाबींसाठी स्वतःची अनमोल उर्जा खर्च करण हे कधीच हितकारक लाभदायी ठरत नाही.हे अगदी वास्तव आहे सत्य आहे पण उत्कर्ष आपल्या खुणवत नाही म्हणून हे सत्य उमजत नाही. जीवन म्हटलं कि वेगवेगळे प्रसंग तर नक्कीच येणार पण आपण कोणत्या प्रसंगासाठी आपली किती उर्जा खर्च करतो त्यानुसारच आपल व्यक्तिमत्त्व हे ठरत असतं.आयुष्यातील धेय्य हे उच्च असलं पाहिजे.लहान



साहान बाबींवर आपली उर्जा खर्च करून आयुष्य निरर्थक करणं हितकारक ठरत नाही.छोट्या छोट्या कारणांसाठी ताण तणाव निर्माण होत असतात त्यासाठी वाद विवाद करून आपली उर्जा व्यर्थ खर्च करण्या ऐवजी त्या ठिकाणी आपण आपली वैचारिक प्रगल्भता दाखवणं हितवाह असतं . उर्जा खर्च करण्यासाठी आपल्या समोर लक्ष्य कसं आहे हे खुप महत्वाचं आहे. दैनंदिन जीवनात वेगवेगळ्या पातळीवर अथवा टप्प्यावर अनेक बाबी कारण नसताना देखील आपल्याशी संघर्षाच्या भुमिका येत असतात. पण संघर्ष अथवा वाद विवाद कोठे घालायचा आणि कोठे नाही घालायचा हे समजणं खूप गरजेचं आहे. हल्ली संयम कमी झाल्याने अनेकदा आपण नको तिथे वादाच्या भोवऱ्यात अडकतो आणि आपली उर्जा व्यर्थ खर्च करून आपला अमुल्य वेळ वाया घालवतो आणि वेळ निघून गेल्यावर मग त्याचे परिणाम भोगुन झाल्यावर आपल्याला हे उमजत पण नंतर उमजून काही अर्थ नाही नंतरच उमजन हे व्यर्थ आहे. म्हणून योग्य वेळी योग्य कार्यसिद्धी करण्यासाठी आपली उर्जा कारणी लागली पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जतला दुष्काळी भाग घोषित करा

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील : तत्काळ योजना कराव्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जत तालुक्याला दुष्काळी तालुका जाहीर करण्याची मागणी करत काँग्रेसचे आमदार विक्रम सावंत यांनी विधानभवनाच्या पाऱ्यांवर ठिय्या आंदोलन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष यांनी या आंदोलनाला भेट देत आपले समर्थन दर्शवले. यावेळी आमदार राजू आवळे, आमदार संजय जगतापही उपस्थित होते.

याबद्दल सविस्तर बोलताना जयंत पाटील म्हणाले की, जत हा दुष्काळी भाग आहे. येथील ६५ गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे. या गावात पाण्याचे दुर्भिक्ष असतेच त्यात यंदा अजूनपर्यंत हवा तसा पाऊस झालेला नाही. पाण्याची तीव्र टंचाई गांभीर्याने घेत या भागात पाण्याची टँकरची व्यवस्था केली पाहिजे तसेच इतरही महत्वाच्या उपाययोजना करायला हव्यात अशा सुचना त्यांनी केल्या. या भागातील काही गावे आम्हाला कर्नाटकात पाठवा अशी मागणी करत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. शासनाने यात वेळीच लक्ष घालावे असा इशाराही त्यांनी दिला. पुढे बोलताना जयंत पाटील असेही म्हणाले की, मागच्या काळात महाविकास आघाडी सरकार असताना माझ्याकडे जलसंपदा विभागाची जबाबदारी होती. त्यावेळी या भागातील पाण्याचा गंभीर प्रश्न लक्षात घेत आम्ही म्हैसाळ विस्तारित पाण्याची योजना आखली होती. या योजनेच्या सर्व गोष्टीची पूर्तता झाली आहे. या सरकारने तात्काळ या योजनेचे काम सुरू करायला हवे.



# अजित पवारांनी सरड्यासारखा रंग बदलला : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अजित पवार आणि धनंजय मुंडे यांनी सरड्यासारखा रंग बदलला आहे. सत्तेत गेलेले लोक वास्तव लपवत आहेत. सरड्यासारखे होऊ नका, अशी आमची त्यांना सूचना आहे, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अजित पवार आणि धनंजय मुंडेंवर टीका केली आहे. सरडा हा रंग बदलणारा प्राणी आहे. मी त्यांना ( अजित पवार आणि धनंजय मुंडे ) यांना सरडा म्हणण्याचं कारणच हे आहे की सत्तेत गेल्यानंतर ते आता वेगळंच वागत आहेत असंही नाना पटोले यांनी म्हटले आहे. इगतपुरीत एका गरोदर मातेचा महिलेचा मृत्यू झाला. या घटनेचे पडसाद विधानसभेत उमटले. नाना पटोलेंनी हा मुद्दा जोरकसपणे उपस्थित करत सरकारला धारेवर धरले. भाजपाला सत्तेचा माज आला आहे पण आता लोक हा माज उतरवतील असंही नाना पटोले यांनी म्हटले आहे. भाजपाकडून मूठभर लोकांना सोयी सुविधा दिल्या जात आहेत असाही आरोप नाना पटोलेंनी केला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टोलच्या मुद्द्यावर भाजपावर टीका केली. त्याबाबत प्रश्न विचारला असता नाना पटोले यांनी राज ठाकरेंनी मांडलेला मुद्दा योग्यच आहे, असे म्हटले आहे. तसेच भाजपावाले टोलमुक्त महाराष्ट्र ओरडत होते त्याचं काय झाले ? भाजपाकडून समृद्धी महामार्गावर निर्दोषांची हत्या केली जाते आहे असाही गंभीर आरोप नाना पटोलेंनी केला. एवढंच नाही तर मणिपूर जळते आहे, तिथला एक अत्यंत भयंकर व्हिडीओ समोर आला आहे तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यावर काहीही बोलत नाहीत असेही नाना पटोलेंनी म्हटले आहे.

# गुणवत्तेबरोबर विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनवणे ही शिक्षकाची जबाबदारी

## गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**करकंब :** केंद्राची शिक्षण परिषद रामभाऊ जोशी हायस्कुल करकंब येथे आज संपन्न झाली. Lets change स्वछता मॉनिटर, शाळासिद्धी, PGI कृतिकार्यक्रम, सेतु अभ्यास आढावा, निपुण भारत कृतिकार्यक्रम, विद्याप्रवेश इ. बाबत सखोल मार्गदर्शन केंद्रप्रमुख आप्पासाहेब माळी यांनी केले. यावेळी पंढरपूर पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी श्री मारुती लिगाडे साहेबांनी शिक्षकांना शैक्षणिक कामासाठी सदैव तत्पर राहण्याबाबत आवाहन करते वेळी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबर संस्काराची रुजवणुकीची जबाबदरी शिक्षकांनी घेण्याचा व नैतिकतेने, प्रामाणिकपणे काम करण्याचा सल्ला शिक्षकांना दिला. शिक्षणाची गंगा सर्वात शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांनी संपूर्ण ताकतीने प्रयत्न करण्याच्या आवश्यकतेवर जोर दिला. तसेच मुलांना शैक्षणिक गुणवत्ते सोबत त्यांच्या शारीरिक व भावनिक विकासासाठी प्रयत्नाचे महत्व ओळखून प्रत्येकाने स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी तत्पर रहाणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगितले. करकंब केंद्रातील जे शिक्षक बदलून गेले त्यांना यावेळी निरोप व करकंब केंद्रात बदलीने आलेल्या शिक्षकांचा स्वागत कार्यक्रम घेण्यात आला. पंचायत समिति पंढरपूर चे कर्तव्यदक्ष गट शिक्षणाधिकारी मारुती लिगाडे साहेब, रामभाऊ जोशी हायस्कुलचे मुख्याध्यापक श्री हेमंत कदम, केंद्रप्रमुख आप्पासाहेब माळी, आदर्श व वरिष्ठ शिक्षक दत्तात्रय खंदारे, सोलापूर जिल्हा शिक्षक सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष शेखर कोरके, सोलापूर शिक्षक पतसंस्थेच्या संचालिका राणी व्हनमाने यांच्या प्रमुख उपस्थितीत करकंब केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय शिंदे, दयानंद विभूते, नागनाथ घाटूळे, विजया पवार, अनिता वेळपुरकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धेश्वर लेंगरे यांनी केले.








महाराष्ट्र Business Katta









# सावकारी व्यवसायावर बंदी घालावी



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**सिगारेट, बिडी, तबांखू, दारू हे विष आहे, ते माणसाच्या आरोग्यासाठी हानीकारक आहे, असावैज्ञानिक इशारा देतात!! या विषाने माणसे दुर्धर आजार अथवा मेली तर चालतील.पण सरकारला तिजोरी भरण्याची चिंता? वारे ! संवेदनशील राज्य सरकार! राज्यात याप्रमाणेच शहर गावात फायनान्स सहकारी पतससंस्थाची दुकाने काढून गरीब व सामान्य कुटुंबाला लुटत आहेत!यामुळे लाखो शेतकरी व सामान्य माणूस आत्महत्या करत आहेत! हजारो कुटुंबे उध्वस्त होत आहे.तरीही पुरोगामी महाराष्ट्र सरकार झोपेत आहे,हे सरकार सावकारी परवाने देत आहे, याची लाजही वाटत नाही.. राज्य पातळीवरच्या वृत्तपत्रात १९ जुलैच्या अंकात चार ओळीची वृत्त वाचण्यात आले.अजितदादा गटाचे आमदार डॉ. किरण लोहामटे यांनी विधानसभेत राज्यात खासगी सावकारी कर्ज व व्याज वसुलीच्या छळामुळे शेतकरी आत्महत्या करत आहे,असा प्रश्न उपस्थित केला होता.**

ही वस्तुस्थिती आहे.या प्रश्नावर शासनाचे उत्तर नाही.केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवित असताना वशेतकरी व सामान्य माणसाला लुटणाऱ्या फायनान्स व सावकारी परवाने गरज तरी काय ? राज्य सरकार एवढे दरिद्री आहे काय. ? वृत्तपत्राला या विषयाचे गांभीर्य दिसत नाही!त्यांना राजकीय वृत्त देण्यात अधिक रस अधिक आहे.

सावकारी व्यवसाय पुरातन काळापासून चालत आलेला आहे,ब्रिटीश काळातही सावकाराकडून शेतकऱ्यांचे शोषण केले जात असे,यातून दंगल झाल्याची माहिती आहे.तेंव्हा ब्रिटीश सरकारने एडवर्ड कायद्या समितीची स्थापना केली.१९०३ ला समितीच्या अहवालानंतर ब्रिटीश सरकारने सावकारी व्यवसाय संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला.१९४६ मध्ये सावकारी व्यवसायाच्या विरोधात कायदा केला. नंतर महाराष्ट्रात १९६० सहकारी अधिनियमात सुधारणा करण्यात आली.त्यानंतर १९८० पर्यंत सहकारी संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप केले .पण १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केला.त्यामुळे राज्य सरकारचे सहकारी संस्थाकडे दुर्लक्ष झाले.त्यामुळे शेतकरी मोठ्या खासगी सावकारीकडे वळला गेला. शेतकऱ्यांचे जमीन बळकाविण्यात जाऊ लागल्या.त्यांचा छळ वाढला.यामुळे २००१ ते २००९ पर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात झाल्या.त्यानंतर राज्य सरकारला जाग आली.यास सावकारी व्यवसाय कारण असल्याचे दिसून आले.महाराष्ट्र शासनाने एका समितीची नियुक्त केली.त्यातून २ एप्रिल २०१४ सावकारी नियंत्रण कायदा आणला गेला. या कायद्यानुसार शेतकऱ्यांच्या शेती परत देणे,फौजदारी गुन्हे दाखल करणे,आदी अधिकार सहकार विभागाला देण्यात आले आहेत,पण आता हा कायदा कुचकामी ठरलेला आहे.कारण सावकारी व्यवसायवाल्यांनी यात पळवाट शोधून काढली आहे.आज महाराष्ट्रात शहरी व ग्रामीण भागात प्रतिष्ठीत राजकारणी,प्राध्यापक, शिक्षक, महाराज सावकारी व्यवसाय करत आहेत. यांचा व्याज दर प्रति महिना दहा टक्के इतका आहे. म्हणजे वार्षिक १२० टक्के इतका आहे.राज्यात हा सावकारी व्यवसाय खुलेआम चालू आहे.याला सहकार विभाग आणि पोलिस यंत्रणेचे अभय आहे.या सावकारी व्यवसायाने राज्यात अनेकांचा बळी घेतला आहे. पुण्याच्या सहकार विभागातील अधिकाऱ्याने याच कारणाने आत्महत्या केली.शेतकरी बँकेच्या कर्ज थकबाकीमुळे कधीच आत्महत्या करत नाही.बँकेचे अधिकारी वसूलीचा तगादा लावत नाहीत.शेतकरी हा गावातील खासगी सावकाराच्या कर्ज घेतो,व्याज वसुलीच्या छळामुळेचे आत्महत्या करतो,हे मुख्य कारण आहे.पण सावकारी करणारे गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती असल्याने त्यांच्या दवाबामुळे शेतकरी कुटुंबाचे नाव घेत नाही.पण शेतकऱ्यांने आत्महत्याचे कारण बँकेचे कर्ज असल्याचे पुढे केले जाते.याला एखादा अपवाद असू शकतो.या आत्महत्येचे कारण सहकार व पोलिस यंत्रणा शोधत नाही.ग्रामीण पत्रकारही याचा शोध घेत नाहीत. राज्यातील सत्ताधारी व विरोधी पक्ष नेत्यांना या विषयाचे गंभीर्य नाही. सावकारी व्यवसाय हा वैध अथवा अवैध असो,तो सामाजिक कँन्सर आहे.राज्याचे तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांनी सावकारी प्रतिबंधक कायदा- २०१४ कायदा अस्तित्वात आणला.
या कायद्याने अनेक शेतकऱ्यांच्या जमीनी परत मिळाल्या आहेत.पण आता सावकारी व्यवसायाचे स्वरूप बदलेले आहे.आता सावकारी करणाराता कर्जदारांकडून कोरे चेक,बाँड पेपर घेत आहेत.कारण याबाबत तक्रार केली की,मी उसने व मदत म्हणून पैसे दिले होते,हा बहाणा करता येतो!या कर्जाचे व्याज थकले की हे लांडगे व्याजासाठी तगादा लावतात, धमक्या दिल्या जातात इतकेच नव्हे.घरी गुंड पाठवून सळो पळो करून सोडतात! पोलिसात तक्रार केली की हे लांडगे न्यायालयात कोरे चेक व बाँड पेपर वापर करतात! राज्यातील सहकार विभागाकडून सावकारी परवाने दिले जातात.याचाही वापर अवैध सावकारी व्यवसायासाठी वापर केला जातोय.नवीन सावकारी कायद्याने पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे अधिकार नाहीत.ते अधिकार जिल्हा उपनिबंधक सहकार विभागाला आहेत.ती तक्रार गोपनीय ठेवावी



लागते,पण सहकार विभाग व पोलिस या कायद्यातील गोपीनियतेचे उल्लंघन करतात! त्यातून सावकार हा सावध होतो! सहकार विभाग थेट गुन्हा दाखल न करता सोयीनुसार धाडीचे नाटक करते!या सावकारी तक्रारीबाबत पोलिस व सहकार विभागाकडून खेळ चालू होतो.पोलिस विभाग यात समेट घडवून आणत असतो.त्यात खाबूगिरी आहे!अवैध सावकारी करणारे लांडगे व्यवसाय करणारे कोऱ्या चेक कागदापत्राव्दारे तक्रारदारास न्यालयायात ओढतात.यात निगोशिएशबल इस्टेमेंटस कायदा १८८१ कलम १३८ चा वापर केला जातोय!यातून कर्जदाराचा अत्यंत छळ होतो.जेणे करून कर्जदाराने म्हणेल तेवढी व्याजाची रक्कम देण्याठा दवाब आणला जातोय.अशी अनेक प्रकरणे न्यायालयात दाखल झालेली आहेत.पण पोलिस विभाग अश्या प्रवृत्तीच्या विरोधात कारवाई करू शकतात.कोल्हापूर पोलिसांनी अवैध सावकाराच्या विरोधात मोहिम उघडलेली होती,त्यांना बेड्यापण घातल्या.पण नांदेड पोलिस विभाग अश्या प्रकरणात कारवाई करत नाही.उलट अश्या लांडग्यांना सन्मानाने खूर्चीवर बसवितात,त्यांना सहकार व पोलिस विभाग वाचविण्याचे प्रयत्न करतो.सहकार विभाग सावकारी परवानधारक नियमाचे पालन करतो की नाही,याची कधी तपासणी करत नाहीत. याबाबत विशेष दक्षता घेतली जात नाही.परवानधारकाने सावकार करताना कर्जाची अधिकृत नोंद करणे पावती देणे,व्याजाचे निश्चित दराचे पालन केले पाहिजे.पण याचे पालन कोणीच पालन होत नाही. त्यांचेवर २०१४ सावकारी कायद्यानुसार आजपर्यत सहकार विभागाने एकही गुन्हा नोंदविलेला नाही.इतके नव्हे,परवाना एकाच्या नावावर दुसरा नातेवाईक हा सावकारी व्यवसाय करत असतो. या सावकारी परवानाधारकाला फलक लावणे बंधनकार आहे.सहकार कार्यालयात दर्शनी भागावर परवानाधारक यादी लावली पाहिजे,असे निर्देश आहेत. पण सहकार कार्यालयात सावकारी परवानधारकांचे नावे फलकावर दिसत नाहीत.
सहकार विभाग व पोलिस विभागाच्या संगनमताने छूपा सावकारी धंदा चालू आहे.अश्या घटनांची पोलिस यंत्रणेने कडे तक्रारी आहेत.या सावकाराच्या छळामुळे राज्यात हजारो लोकांनी, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत! याची आकडेवारी उपलब्ध नाही.
यावर राज्य सरकार गप्प आहे !.हे लांडगे आर्थिक अडचणीतअसलेल्या कुटुंबाला विशेषतः महिलांना आर्थिक मदतीच्या नावावर लुटतात!हे सावकारी बहुरूपी आहेत,याबाबत पोलिसात तक्रार झाली की,ते समाज सेवक बनतात. पण त्यांनी कोरे बांड पेपर व चेक का घेतले ? हे कोणी का विचारत नाही.पोलिस विभाग त्यांची बाजू घेतो.त्यामुळे याकायद्यात दुरूस्ती करण्याचे गरज आहे.हे लांडगे सहकार विभागाला भीत नाहीत. ते केवळ पोलिसांच्या खाक्याला घाबरतात.
पुण्यात अवैध सावकारीमुळे निवृत्त सफाई कामगार अनुसया पाटोळे या महिलेला भीक मागण्याची वेळ आली.परभणीत तरुणाने हात लिहून आत्महत्या केली. पुण्यात एका सहकार अधिकाऱ्याचा या व्यवसायाने बळी घेतला.मराठवाड्यात व विदर्भात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा घटना आहेत शिवाजीनगर कोट्यवधी रूपये व्याजाने देणारा सावकारी खुलेआम व्यवसाय करतो. याबाबत पोलिसांना माहित आहे. याला राजकीय आर्शीवाद आहे.एका सावकाराने एका महिलेच्या नातीच्या उपचारासाठी ४० हजाराचे कर्ज दिले,त्यापायी ८ लाख वसूल केले.नंतर या लांडग्याला अटक झाली. राज्यात सहकारी बँका,राष्ट्रीय बँका पतसंस्था असताना राज्य सरकारला सावकारी परवाने देण्याची गरज का भासते ?सावकारी वैध असो अवैध तो कायमचा बंद करण्याचा विचार का केला जात नाही ?या लांडग्यानी माझ्या कुटुंबाला लोकांचा बळी घेतला व शेकडो कुटुंब देशोधडीला लावले आहेत. याबाबत पोलिस वरिष्ठापर्यंत तक्रार करूनही उपयोग झालेला नाही.नांदेडचे पोलिस विभाग, सहकार विभागाने शपथपत्र देऊनही गुन्हा नोंदवित नाहीत. महाराष्ट्रात सावकारी व्यवसाय कँन्सर सारखा पसरत चालला आहे.मी सावकारी व्यवसायाबाबत राज्याचे मुख्यमंत्री,सहकार मंत्री,विरोधी पक्ष नेते,सत्ताधारी पक्षाचे लोकप्रतिनिधी यांना अनेकवेळा निवदने दिली. याबाबत १९१९ पासून या कायद्याच्या विरोधात लढा देत आहे.या तरी महाराष्ट्र सरकार जागे होत नाही.तरीही राज्य सरकार या प्रश्नावर संवेदनशील नाही,हे दिसतेय ? राज्य शासनाने श्रीमती चित्रा वाघ यांची समिती नियुक्ती केल्याची माहिती आहे!पण त्या काय करत आहेत ? हे राज्य सरकारला माहित! पुरोगामी महाराष्ट्राने लोकांचा बळी घेणाऱ्या सावकारी व्यवसायाला बंदी घातली पाहिजे.

# कै.डॉ. द.भी. कुलकर्णी एक साहित्य परिस स्पर्श

आधुनिक केसरी

**गुरुवर्य कै.मा. डॉ.श्री.दत्तात्रय भिकाजी कुलकर्णी म्हणजे ज्येष्ठवृंद,अभ्यासु प्रख्यात समीक्षक, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष. सर्वश्रुत व्यक्तीमत्व. प्रत्यक्ष त्यांचा सहवास लाभणं म्हणजे एक आनंदच ! आणी असा सर्वार्थांन सुंदर , लाघवी , मायाळू , माणसाळू अशा सर्वच व्यक्तिमत्वाचा सहवास पूर्वसुकृतानेच लाभतो असं मला वाटतं !**

मी स्वतः व्यवसायाने एक पत्रकार , संपादक, मुद्रक प्रकाशक असल्यामुळे आजपर्यंत मला योगायोगाने अनेक ज्येष्ठ साहित्यिक , कवीकवयित्री यांचा सहवास लाभला. हे मी या लेखमालिकेत विदित केलेले आहेच. पण तरीही ' द.भी. यांचा माझा सहवास प्रदीर्घ आहे . आणी दभी सर हे अत्यंत मोकळे , दिलखुलास , प्रेमळ , मार्गदर्शक असे व्यक्तीमत्व होते हा माझा स्वानुभव आहे.
त्यांना भेटावयास येणाऱ्या सर्वांचच अगदी अगत्यपूर्वक स्वागत करण्याची त्यांची समाधानी , आनंदी - दातृत्वी मार्गदर्शक प्रवृती हेच त्यांचे वैशिष्ट्य होते. अशा सर्व गोष्टी कधी एकत्रित जाणवत नाही हे खरं ! पण डॉ. दभी सर याला निश्चितच अपवाद होते हा माझा स्वानुभव आहे.
आपण सरांना भेटण्यासाठी फोन करावा ...आणी फ़ोनवरुनच त्यांचा दभी असा आवाज यावा.. मग सर येवू कां ? असं आपण विचारवं ! आणी सरांनी ...लगेचच " या , या " असं सहज प्रत्युत्तर यावं !..आपण वेळे प्रमाणं निघावं ...आणी पुण्याच्या पश्चिमेकडील डीएसके विश्व धायरी या टेकडीवरील रम्य अशा नैसर्गिक परिसरात प्रवेश करताच मन प्रसन्न व्हावं..आणी यथावकाश दभी सरांच्या घराच्या प्रवेशद्वारात उभं रहावं ..आणी लगेचच समोर हिरव्या रंगाच्या भिंतिवर दभी ही सफेद पांढऱ्या रंगाची फक्त दोनच अक्षरे आपल्या नजरेत सहज भरावीत. आणी आपण प्रसन्न व्हावं ..अशी अवस्था होते . तशी दभी ही दोनच अक्षरे सर्वार्थांने सर्वश्रुत आहे. दूसरे महत्वाचे म्हणजे दभी.सरांच्या वास्तूच्या प्रवेशद्वाराचा दरवाजा फक्त आतिल बाजूसच उघडला जातो . बाहेर उघडत नाही . याचाच अर्थ सर्वांनाच आत आनंदाने येण्यास पूर्णतः मोकळीक आहे. स्वागत आहे...
पण बाहेर पड़ताना तो दरवाजा बाहरेच्या बाजूस उघडतच नाही, तो आतील बाजूसच उघड़तो हे वैशिष्ठ्य ! कारण दभी सरांचा सहवास किंवा त्यांच्या शब्दसागरातील संवाद सोडून बाहेर पडण्याची ईछयाही आपल्या मनाला होत नाही ही वास्तवता नाकारता येत नाही.
दभीसरांचे घर म्हणजे हिरवाई. पुस्तकांनी गच्च भरलेला एक सुंदर बगीचा. अनेक अनमोल अशा पारितोषिकांची , मानपत्रांची रेचलेल ! घराच्या अंगणात अगदी खुपच साधा पण खुपच मोहक हवा असणारा स्वागत कक्ष. त्यामध्ये त्यामध्ये एक सुंदर छोटसं असं संस्कृती आणी संस्कारंच प्रतीक असलेलं वृंदावन ! शेजारी सोफा , खुर्च्या सोबत एक सात्विक ऐश्वर्याची साक्ष असणारा झुलणारा झोपाळा आणी एक छानसा टी-पॉय अशा वातावरणात आपण सारेच सहज आदरयुक्त भीतिने प्रवेश करतो हे खरं ! *
पण दभी जेंव्हा अत्यंत नम्रतेनं , शांत प्रसन्न मुद्रेने आपलं स्वागत करतात तेंव्हा आपली ती भिती नाहीशी होते ....
"या ! या ! असे म्हणतच आपलं स्वागत दभी सर करतात . त्याक्षणीच सरांच्या त्या लडिवाळ प्रेमळ शब्दांनी आपलं आणी त्यांच अनेक जन्मांचंच नातं असल्याचं जाणवून जातं !!!सर्वांनाच बसा ! बसा! म्हणून स्वतःच घरात जावून सर्वांसाठी थंड पाणी आणून टी-पॉय वर ठेवतात आणी अगदी सहज झोपाळ्यावर आसनस्थ होतात. हळूहळू विषयानुरूप गप्पा सुरु होतात.... दभी या शब्दप्रभुंची , शब्दब्रह्माची रिमझिमणारी बरसात झुळझुळू लागते.अन मग त्या शब्दांनी आपले मनांतर अधीक समृद्ध होतं ! हा माझा प्रत्येक भेटीतील अनुभव आहे ..
अचानक मध्येच क्षणभर स्वतः उठतात . घरात जातात....विविध मिठाईचे बॉक्स आणून टी-पॉयवर ठेवतात. मग त्यात इंदुर ,नागपुर , साताऱ्याची मिठाई ,पेढ़े, संत्राबर्फी काजुबर्फ़ी असे. गोव्याचे काजू , केळी , काजू कतली , बेळगावचा कुंदा , गरम गरम बटाटे वड़े



, भजी , मुगभजी ,असे अनेक पदार्थ समोर ठेवून स्वतः जातीने आग्रह करून आपल्याला खाण्यास प्रवृत्त करतात . हे सारे मी स्वतः अनुभवले आहे . आपण खात रहातो.... .. दभी बोलत रहातात.
अनेक साहित्य विषयांचा सखोल अभ्यास ! ज्ञानेश्वरी , तुकाराम गाथा , एकनाथी भागवत , गीता , वेदशास्त्र पुराण , ग्रन्थ इत्यादी विषयावरील त्यांचे प्रभुत्व सर्वांना त्यांच्या वाणीतुन जाणवते. आपण फक्त ऐकत रहावं ! ते आपली मार्गदर्शकाची भूमिका लीलया बजावत असतात. महाकवी कालिदास हा तर त्यांचा पीएचडी चा विषय होता. त्यांच्या अस्खलित वाणीतुन कधी कधी आपण न ऐकलेले अर्थपूर्ण शब्द देखील वारंवार अगदी सहज येत असतात. माझ्यासारख्या सर्वसामान्य अनभिज्ञ व्यक्तीला त्या शब्दांचा अर्थ कळलेला नसतो , तेंव्हा मी अज्ञानापोटी कुतूहलतेंन त्यांना त्या शब्दाचा अर्थ विचारतो तेंव्हा दभी सर त्या शब्दाचा सखोल अर्थ समजून सांगत असत . समोरच्या व्यक्तीला अंर्तमुख करण्याची त्यांची हातोटी आहे .
असाच एकदा त्यांच्या बोलण्यात अंभ्रूणी हा शब्द आला होता.आम्ही बरीच मित्र मंडळी होतो . त्यावेळी आम्हा कुणालाच त्या अनभिज्ञ अंभ्रूणी शब्दाचा अर्थ कळला नव्हता. तो सरांनी आम्हा सर्वांनाच अगदी विस्तृत पद्धतीने समजावून सांगितला. अंभ्रूणी हा वेदसुक्तामधील शब्द असून त्याचा अर्थ " वाणीची वैदिक देवता असा आहे , असे सांगून त्याचे सार्थ विश्लेषण ही केले. सरांच्या सहवासात नेहमीच अगदी मोकळे पणाने साहित्य विश्वातील अनेक वैचारिक मूलभूत प्रश्नांची उकल त्यांच्या मार्गदर्शनातून होत असते. साहित्य क्षेत्रातील गुरुस्थानी असलेल्या अशा वंदनीय व्यक्तीला माणसं आवडतात. माणसांशी हितगुज , विचार - विनिमय , संवाद करणे तसेच गरजवंतांना उत्तम यथायोग्य मार्गदर्शन करणे आवडतं ! हाच त्यांचा सहजसुंदर दैवी सद्‌गुण आहे . स्वभावत कुठल्याही प्रकारचा अहंकार नाही . मी पणा नाही याचा सातत्याने प्रत्यय येत असतो .
अनेक साहित्य संस्थाना त्यांचे मार्गदर्शन असते . आणी हे सारे करताना संस्थेच्या कुठल्याही पदासाठी मला आग्रह करु नका हे ते अगदी नम्रतेने सांगत असत ..!!
प्रयत्नान्ती साहित्य क्षेत्रातील अत्युच्य शिखरावर पोहचुन देखील स्वान्त सुखाय या परिपूर्ण अवस्थेत देखील सर्वसामान्य माणसांच्या सहवासात निःस्पृहतेन, आनंदान रहाणं ! जे ज्ञान आपल्याजवळ आहे ते अगदी मुक्तपणे , सहज सास्त्विकतेंनं देत रहाणं ! काटेकोर पणे आपली साहित्य समीक्षकाची भूमिका निभावणं ! या साऱ्या भूमिका लीलया निभावणारे डॉ. द.भी.कुलकर्णी सर एक अलौकिक अंभ्रूणी व्यक्तीमत्व म्हणावे लागेल ....!!!!
यापूर्वीच्या भागामध्ये मी त्यांच्या बद्दल लिहिलेले आहेच.
प्रत्येक व्यक्ती चांगलीच असते. सहवासाअंती आपल्याला ती व्यक्ती उमजत जाते हे वास्तव आहे. आपली समीक्षक वृत्ती ही राजहंसी असावी.
मानवी जीवनाचे अनेक विविधांगी कंगोरे असतात. आपल्याला वैयक्तिक त्या जीवनाची जी अनुभूती येते. ते सत्य असते. जे चांगले असते पहावे , वेचावे , जे लिहिण्यासारखे आहे ,जे सांगण्यासारखे , जे वैचारिक प्रबोधन करू शकेल असे लिहीत रहावे...

**वी. ग.सातपुते ( आप्पा )**
**संत चरित्रकार, भावकवी, सुप्रसिद्ध साहित्यिक ( संस्थापक अध्यक्ष महाकवी कालिदास प्रतिष्ठान धायरी पुणे ) 9766544908**

# दीपकभाऊ निकाळजे हीच आमची सत्ता

आधुनिक केसरी

**सत्ता अनेकांची येते जाते,सत्तेतून पाय उतार होण्याची वेळ ही येत असते,सत्ता कोणाची ही असो परंतु ज्यांच्या नेतृत्वाखाली आमच्या सारख्या तळागाळातील कार्यकर्त्याला काम करण्याचे व एक लढण्याचं हुरूप येत असतं. ते आमचं नेतृत्व म्हणजे दीपकभाऊ निकाळजे होत.आम्ही कोणत्या सत्तेत असो किंवा नसो परंतु दीपकभाऊ निकाळजे सारखा नेता जेव्हा आमच्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना लढण्याचं बळ देतो.तेव्हा हेच बळ दीपकभाऊ निकाळजे यांच्या आधाराने पुढे पाऊल टाकत जात असते. आज भाऊंचे आमच्या पाठीशी असणे आमच्यासाठी काम करणारी एक ऊर्जा,प्रेरणा आहे.**

दीपकभाऊ निकाळजे हीच आमची सत्ता असल्याची भावना आमच्या मनात रुजलेली आहे.गेली २५ वर्षांपासून दीपकभाऊ निकाळजे हे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातून कार्यरत आहेत.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आंबेडकर ) या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय स्तरावर पक्षास बळकटी आणण्यासाठी त्यांचे विशेष प्रयत्न सुरू आहेत.राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने ते एक महत्वाची जबाबदारी सांभाळत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्ष निर्माण करण्यासाठी विविध राज्यातील नेते मंडळी कार्यकर्ते पदाधिकारी यांच्याशी त्यांच्या भेटी गाठी होत असतात.

महाराष्ट्राच्या विविध भागातून सुध्दा ते दौरे करत असतात. सातारा जिल्ह्यातील गिरवी हे दिपकभाऊ यांचे मूळ गाव असून फलटण-कोरेगाव हा विधानसभा मतदारसंघ राखीव झाला होता. तेव्हा त्यांचे नाव सुद्धा चर्चेत आले होते. जानेवारी २०२३ मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आंबेडकर ) चे १० वे राष्ट्रीय अधिवेशन चंदन लॉन्स, चेंबूर, मुंबई येथे दीपकभाऊ निकाळजे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले होते.यावेळी विविध राज्यातील पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तसेच पदाधिकारी उपस्थित असताना दीपकभाऊ निकाळजे यांची दुसऱ्यांदा पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.संविधान हे आपले अस्तित्व आहे.आपला श्वास आहे, अशी भावना दीपकभाऊ यांची असून संविधानाच्या विरोधात जे असतात. त्यांना विरोध करण्याची भूमिका ते घेत असतात. जे संविधानाला हात लावेल. त्यांचे हात कलम केले जातील, अशी आक्रमक भूमिका ते वारंवार विविध पक्षीय कार्यक्रमातून घेत असतात. राष्ट्रीय अधिवेशनास संबोधित करताना भारतीय संविधानाचे रक्षण करण्यासाठी आपण एकजुटीने राहिले पाहिजे. असा मोलाचा संदेश ही त्यांनी दिला. तुम्ही मला साथ द्या;तुम्हाला सत्ता दिल्या. शिवाय


राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे वाढदिवस विशेष लेख

राहणार नाही. असा शब्द ही दीपकभाऊ निकाळजे यांनी दिलेला आहे. जातीयवादी शक्तींच्या विरोधात लढण्यासाठी दीपक भाऊ निकाळजे यांचे पाऊल कायम पुढेच असते. आपल्याला लढले पाहिजे. हे नेहमी कार्यकर्त्यांना म्हणत असतात. दीपक भाऊ यांनी घेतलेल्या भूमिका खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांना बळ देत असतात.दीपक भाऊ निकाळजे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत असताना आज त्यांच्या समवेत सर्व जाती धर्मातील लोकं पक्षात काम करताना पाहायला मिळत आहे.आपला आरपीआय हा सर्व जात समूहांच्या हक्कांसाठी लढणारा असून येणाऱ्या काळात निवडणुकीच्या माध्यमातून ही राजकीय झलक दाखवेल असा विश्वास दीपकभाऊ व्यक्त करत असतात. दीपकभाऊ यांचे हात बळकट करण्यासाठी सदैव भाऊंच्या सोबत आम्ही कार्यकर्ते, पदाधिकारी म्हणून राहणार आहोत. भाऊंना हीच त्यांच्या वाढदिवसानिमित्त मंगलमय सदिच्छा.

# संतांच्या मते शाश्वत सुख कोणते ?


श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**प्रत्येक धर्मातील धार्मिक माणूस आपल्या पुजास्थळी जातो. काही मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा, विहार, अग्यारी, प्रार्थनामंदिर अशी ती अनेक स्थळे आहेत. तेथे तो आपल्या आराध्य दैवताची पूजा-अर्चा, इबादत, आरती, बुलावा, धावा, भजन, प्रार्थना, वर्शिप आदी करतो. हे तो का करतो? आपल्याला ईश्वरप्राप्ती व्हावी व शाश्वत सुख लाभावे, म्हणून तो हे कृत्य करतो. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी हरिपाठात म्हटले आहे- "रूप पाहता लोचनी। सुख जाले वो साजनी।।हरि मुखे म्हणा, हरि मुखे म्हणा।। पुण्याची गणना कोण करी।।" या संतवचनास अनुसरून तो याच कृत्यांना देवपूजा, ईश्वरोपासना अर्थात भग्वदभक्ती समजतो. त्याला खरे तर शाश्वत सुखाचाच अर्थ उमगलेला नसतो. तो हे सुख धन, संपत्ती, संतती, शरीरस्वास्थ, ऐशो-आराम, दीर्घायुष्य, मृत्यू न येणे, दुःखाची चाहूलही न लागणे आदी गोष्टींतच शोधत असतो. संतांच्या मते हे काही शाश्वत सुख नव्हे.**

या गोष्टींची आस ही भौतिक आणि क्षणिक सुखांची लालसा होय. जन्म-मृत्यूच्या चक्रीवातातून, चौऱ्यांशी लक्ष जन्मयोनीतून सुटका होणे, हे खरे शाश्वत सुख आहे. त्यालाच मोक्ष व मुक्ती म्हटले जाते. ज्या कृतीने मोक्ष व मुक्ती अर्थात अमरपद प्राप्त होते, ती कृती म्हणजेच खरी भग्वदभक्ती असते. अन्यथा उपड्या घड्यावर पाणी ओतून मी घडा भरत आहे, असे छाती ठोकून सांगण्यासारखे आहे. संत ज्ञानेश्वरजी महाराजांनी नकलून ठेवले आहे-

**"योग याग विधी।**
**येणे नोहे सिद्धी।**
**वायाची उपाधी।**
**दंभ धर्म।।"**

शाश्वत सुख मिळवून देणारी भक्ती आपल्या मन-मर्जीने करता येत नाही. ती मोक्षदाता सद्गुरू प्रणित असावी लागते. असा सद्गुरू प्रत्येक युगात अवतरत असतो. तो जगात सर्वसामान्य माणसासारखाच वावरत असतो. तो 'मी ईश्वराचा अवतार आहे. इच्छित वस्तू तुम्हाला मिळवून देतो. मृत्यूपासून तुमची सुटका करून देतो. या, चमत्कार बघा." अशा पोकळ बाता व थापा कधीच मारत नाही. यासाठीच जगद्गुरू संत तुकाराम महाराज जागवितात-

**"जाणारे जाणा, देवाला जाणा!**
**जाणारे करा कल्याण!**
**ऐसे वदती वेद पुराण!!"**

कारण खरा परमेश्वर- परमात्मा तो हा निर्गुण-निराकार असून तो असा सद्गुरूच्या सगुण-साकार रुपात आपल्यात वावरत असतो. या जगी तो आजही आहे; त्याचा शोध घेतल्यास, पारख केल्यास कळून येईल. भगवान श्रीकृष्ण अवतरले, तेव्हा त्यांनी स्वतः ईश्वर असल्याचे कोणालाच सांगितले नाही. सगुण-साकार रुपात प्रकट होऊन भगवंताने सर्वसामान्य माणसाप्रमाणे व्यवहार केले. जगतकल्याणाची कार्ये केलीत. ब्रह्मज्ञानाची इच्छा, परमपित्याचे विश्वरूप दर्शन करण्यासाठी महावीर अर्जुन श्रीचरणी नतमस्तक झाला. तेव्हा ते भग्वदगीता या पावण ग्रंथाएवढे ज्ञान आध्यात्मिक सद्गुरू श्रीकृष्णाने डोळ्याची पापणी लवत नाही एवढ्या वेळात-क्षणार्धात ब्रह्मदर्शनासह ब्रह्मबोध केला होता. काही लोकांना योगायोगाने अशा सद्गुरूची भेट झाली, तरी ते त्याच्या करवी ब्रह्मबोध घेऊन खऱ्या भक्तीचा श्रीगणेशा करण्यास धजत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. कारण त्यांना वाटते, की आतापासून कशाला टाळ कुटायचे? भक्ती तर म्हातरपणीचा विषय आहे. मला सांगा, भक्ती ही वृक्षवेली, पशुपक्षी आणि किडामुंगी आदी जन्मांत होते का हो? नाही होत. म्हणून संपूर्ण मानवजन्मच भक्ती करून मुक्ती मिळविण्याची सुवर्ण संधी असते. मग ती म्हातारपणीच कशी काय सफलपूर्ण होऊ शकेल? शक्यच नाही. काही जण तर त्यापूर्वीच गचकतात आणि सर्वात महत्वाची गोष्ट- भक्ती करावयाची राहूनच जाते. मग गेला ना नरजन्म वाया? ग्रंथकार भर्तृहरिने लिहिले-

**"भोगा न भुक्ता वयमेव भुक्ताः|**
**तृष्णा न जीर्णा वयमेव जीर्णाः||"**

अर्थ- आपण भोगांना नाही तर भोगांनीच आपल्याला उपभोगले, तसेच आमची तृष्णा जीर्ण झाली नाही तर आम्ही वयानेच जीर्ण झालो. आम्ही कामनांना रोखल्याशिवाय मोक्ष फार दूरची गोष्ट होईल.

आपण ज्याचे भजन, पूजन, नामोच्चार, कीर्तन, नामस्मरण आदी करतो, त्याचे रूप नको का बघायला? तो देव पाहिलो, ओळखलो, विश्वास ठेवलो आणि त्याचा ठावठिकाणा माहित केलो तरच आपली भक्ती यशस्वी ठरेल. जसे की पवित्र बायबल ग्रंथ ग्वाही देतो- **"नो द गॉड यी वर्शिप!"** (पूजा करता त्या प्रभुला



जाणा.) जगात देव एक आहे, की अनेक आहेत, याचे ज्ञान झाले तर माणसांमाणसांतील भेदभाव नष्ट होऊन धर्म, जाती, लिंग, वर्ण यातील भ्रमभ्रांती दूर होईल. तो एकमेकांशी बंधुभावाने, गुण्यागोविंदाने नांदू शकेल. यासाठी भगवंताने कालावधी निश्चित करून दिलेला आहे, तो म्हणजे मानवजन्म. माणसाने जीवन असेपर्यंत सांप्रत सद्गुरूकडून देवाला पाहूनच भक्ती करावी व नरजन्माचे मोल वाढवावे. आपला-परका भेदभाव न ठेवता अंतीम समयी आत्मा परमात्म्याशी एकरुप आणि एकजीव करून घ्यावा. जसे की एका शायरने उद्बोधक रचना केलीय-

**"किसको पत्थर मारे; कौन पराया है?**
**शिस महल में हरेक चेहरा अपना लगता है!"**

बघ्यांच्या गर्दीत आपल्या लाडक्यांना समोरचे दृश्य दिसावे, म्हणून मायबापांनी त्यांना खांद्या-कडेवर उचलून धरले होते. आपण त्यांना याबद्दल विचारले तर ते सांगतात, की त्यांनी जे पाहिले नाही ते त्यांच्या अपत्यांनी पहावे. म्हणून त्यांची ती धडपड होती. विद्यमान सद्गुरूचीही अशीच महत्त्वाकांक्षा आणि तळमळ दिसून येत असते, म्हणूनच त्यास आईची उपमा देतात, सद्गुरू माऊली संबोधतात. मायबापांनी खाली उतरवून ठेवले तर ती मुले म्हणतात, की त्यांना काय ते बरोबर दिसले नाही. पुन्हा उचलून घ्यावे. गाडी बसस्थानकावर आलेली बघून ते तिकडे धावतात. त्यामुळे मुलांना ते दृश्य परत कधीच बघता येत नाही. कारण ती एक चांगली वेळ- सुवर्ण संधी असते. ती एकदा चुकली-हुकली तर पुन्हा कधी येईल, हे सांगता येत नाही. कारण पुढे चौर्यांशीचा फेरा पडू शकतो. अगदी तसेच नरजन्माचे असते, ईशोपासना करण्याची, ईश्वरदर्शन करण्याची वेळ निघून गेली तर मनुष्य पुन्हा चौऱ्यांशीच्या फेऱ्यात पडतो. जंतू, किडा, मुंगी, डुक्कर, गाढव, वृक्ष, वेली, गिधाड, चिमणी, गाय, अशा अनेक जन्म-मरणाच्या कचाट्यात सांपडतो. संत शिरोमणी अवतारसिंहजी महाराज म्हणतात- सम्पूर्ण अवतार बाणीः पद- ७८-

**"बिन देखे यह मन नही माने बिन मन माने प्यार नही।**
**प्यार बिना न भक्ति हो बिन भक्ति नैया पार नही।"**

म्हणून माणसाने परमार्थाची व सन्मार्गाची तातडी केलेलीच बरी! कारण मनुष्यजन्म पुनः पुन्हा नाहीच!

# चिमूटभर प्रेम


प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**जगण्यासाठी माणसाला कितीशा गोष्टी हव्या असतात बरं? अन्न, वस्त्र, निवारा, पोशाख....बस्स झालं. आणि आता मी म्हणाले की या ही पलीकडे अशी एक जीवनावश्यक गोष्ट आहे जी वरील चार गोष्टी इतकीच महत्वपूर्ण आहे. तिच्या न मिळाल्याने असे नैराश्य दाटेल की, प्रसंगी जगणे कठीण होऊन जाईल. काय बरं असावी अशी गोष्ट. अहो! फार अवघड नाही काही, माणसाला जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा याबरोबर चिमूटभर प्रेमही हवं असतं. आयुष्याला गोडवा येण्यासाठी या चिमुटभर प्रेमाची साखर ओतावीच लागते. त्याशिवाय काय जगणं सुंदर होतं. आपल्याला प्रेम करणारी आणि न करणारी अशी दोन प्रकारची माणसं असतात. प्रेम करणारी व्यक्ती किती प्रमाणात प्रेम आपल्यावर लुटवेल हे सांगता येत नाही.**

प्रेम न करणारी व्यक्ती कितीकाळ न करेल हे ही सांगणं तितकच कठीण. पण यात आपली भूमिका काय तर जे प्रेम जेव्हा मिळत असते ते त्यावेळी सांभाळून ठेवणे. प्रेम कस्तुरी आपल्या जीवनात निव्वळ सुगंधच आणत नाही तर एक प्रकारचे जगण्याला कारण देते. देणाऱ्याचे प्रेम घेता येणे आणि न देणाऱ्याचे प्रेम मिळवता येणे. खरं तर हे प्रेम तुम्ही माणसाकडून अपेक्षित करत असालं तर मग यात धोका पण पत्कारावा लागेल. कारण की माणूस मुळातच फारसा तर्कशुद्ध वागवणारा प्राणी नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वात अनेक विसंगती असतात. मी वाचलेलं आहे. Man is an irrational animal. या विधानाचा अर्थ हाच होतो. माणूस अनेकदा तर्कविसंगता वागतो आणि वागण्याचे समर्थन करण्यासाठी तो तर्कशुद्ध बैठका भरवतो. या तर्कात क्वचितच तत्त्वज्ञान बनते. आणि मग या तत्वज्ञानाचे प्रेमात रूपांतर करण्याचे काम बरेचजण करू पाहत असतात. पण ते शक्त थोडीच आहे. प्रेम तर या सर्वापलिकडे असते. जिथे देण्या घेण्याची भूक नसते आणि स्वार्थ ही नसतो. जे असल्याने आपल्याला आधार मिळतो. नवी वाट गवसते, जगणं सार्थक होतं.

मला अगदी लहानपणापासून निसर्गाच वेड आहे. आई सांगायची मी अगदी लहान म्हणून दोन अडीच वर्षाची असेल तशी मला झाडं, पान, फूल पाहिलं की असा आनंद व्हायचा आणि पाऊस आल्यावरच तर दारात बसून मी टाळ्या पिटायचे. आईने मला अंगणात आजोबासवे बसून दिलं कि मी तासन् तास रमतं बसायचे. तोपर्यंत ती आपली सारी कामे संपवून मला झोपी घालायची. हे सारं ऐकताना मला नेहमी हा प्रश्न पडतो. आपल्याला आपलं बालपण आठवायला हवं होतं जरं देवाने तशी सोय केली असती तर मलाही आता ऐकता आलं असतं त्यावेळी निसर्ग माझ्यासोबत नक्की काय असं बोलतं असेल ज्यामुळे मी इतकी आनंदी व्हायचे. त्यावेळी तो माझ्याशी गप्पा मारायचा आणि आता मी त्याच्यासोबत एवढाच काय तो बदल झाला आमच्यात. बाकी आमचं प्रेम अजूनही तेच आहे हो! फार कमी लोकांच्या नशीबी असतं असं निरागस प्रेम भाग्याने मला ते लाभलं याची धन्यता वाटते मला. प्रेमाची कल्पना ज्यावेळी माझ्या मनी उभी राहते. त्यावेळी प्रेमा मी निरनिराळ्या आरशातून पाहते. प्रेम भित्रं असतं, कातर असतं, मत्सरीसुद्धा असतं. मला आठवतं 'उत्तरमेघा' त यक्षानं डोळ्यापुढे उभी केली होती आपली विरहकृश पत्नी. तिच्या सहवासाच्या कितीतरी करुणरम्य चित्रांनी त्याच्या मनात गर्दी केली होती. प्रेम युगलामध्ये प्रियसीचि भीती नेहमीच आपल्या प्रियकराच्या प्रेमासाठी असते. तो आपल्याला सोडून उगा दुसऱ्या तरूणीला रमवतं नसेल ना ? या भीतीच्या घेरात ती वावरतं असते. पण मला असे वाटते प्रेम हे शाश्वत असले की खात्री आणि विश्वास दोन्ही एकाच ठिकाणी वावर करतात. मंद असावे जरा चांदणे, कुंद असावी हवा जराशी करूणाभरल्या मुकटापणि अन् तुला धरावे जरा उराशी बोरकरांच्या मनात प्रेमासाठी इतक्या मोहक कल्पना अशा एकवटल्या असणार हे मला नेहमी वाटते. पण पूरेम युगलासाठी हे भावमोहोळ जमणं स्वाभाविक आहे. शेवटी तुमचं प्रेम कसं आहे आणि कोणतं आहे हे महत्त्वाचं नाही, त्या प्रेमात तुम्ही तुम्हांला कसं ठेवता हे महत्वाचं. त्याशिवाय काय जगण्याला गमंत येईल. माझं प्रेम बालपणापासून माझ्यासोबत आहे आणि ते असेच राहणार त्या प्रेमाला निराळा गंध आहे यात शंका नाही. प्रत्येक मनातून पाझरणारा 'प्रेम' या चिरंतन मूल्याचा उत्कट ऐहिक स्पर्श! काही निराळाच वाटतो.

# पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी खबरदारी घ्या

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचे व खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणच्या औरंगाबाद परिमंडल कार्यालयाने केले आहे. मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे तुटलेल्या फांद्या वीज वहन तारांवर अडकून पडल्या असल्यास त्या स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. तसेच झाडे पडल्याने वीजखांब वाकला वा मोडला जातो. परिणामी वीजतारा तुटण्याचे प्रकार घडतात. त्यात वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने अशा तुटलेल्या, लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सावध राहावे. या तारांना हात लावण्याचा किंवा हटवण्याचा प्रयत्न करू नये आणि त्वरित महावितरणशी संपर्क साधावा.

झाड तोडताना त्याच्याजवळ अथवा सानिध्यात विद्युत तारा येत नाहीत ना याची खबरदारी घ्यावी. अशा तारा असतील तर त्यातील वीजप्रवाह महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून बंद करून, सुरक्षित करून मगच अशा फांद्या तोडाव्यात. ग्राहकांनी कोणत्याही विद्युत खांबांना, तारांना, वाहिन्यांना व अन्य उपकरणांना स्पर्श करू नये. तसेच विद्युत खांबांना व उपकरणांना जनावरे बांधू नयेत. त्यास दुचाकी टेकवून ठेवू नयेत किंवा विद्युत खांबांना तार बांधून कपडे वाळत घालू नयेत.

घरात आरसीसीबी ( रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर ) बसवावे, जेणेकरून घरातील वीज यंत्रणेत बिघाड झाला तर वीजपुरवठा बंद होऊन जीवितहानी टाळता येईल. अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करा. गरजेनुसार त्याची तपासणी करावी. वीज उपकरणे किंवा वायरिंग ओलाव्यापासून किंवा पत्र्यापासून सुरक्षित असावी. वीज उपकरणे हाताळताना पायात स्लिपर घालावी व वीजपुरवठा बंद झाल्याची खात्री करावी. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेन स्विच तात्काळ बंद करावा. घरावरील दूरचित्रवाणीची डिश किंवा अँटेना वीज तारांपासून दूर ठेवावा. ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये. विजेचे स्विच बोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेषतः टिन पत्र्याच्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी पावसाळ्यात अतिदक्ष राहून विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. विद्युत वाहिनीवर आकडा टाकून विद्युतपुरवठा घेण्याचा प्रयत्न करू नये.

घरात बसवलेल्या मीटरवर पाणी पडत असल्यास किंवा मीटर असलेली भिंत ओली असल्यास त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरामध्ये असलेली विद्युत यंत्रणा व घराजवळ असलेली अर्थिंग मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून तपासून घ्यावी. मीटर बोर्डापासून मोटारीपर्यंत जाणाऱ्या केबल्सना जोड देऊ नये. चालू स्थितीतील मोटार यंत्र उचलून दुसऱ्या जागी हलवू नये. अंगणात, परसदारी दिवा लावण्यासाठी फ्लेक्झिबल वायर पत्र्यावरून अथवा धातूच्या दारातून अँगलला गुंडाळून नेणे धोकादायक आहे. त्यामुळे सर्व धातूच्या वस्तू विद्युत प्रवाहित होऊ शकतात. घराचे बांधकाम विद्युत वाहिनीखाली अथवा सुरक्षित अंतरापेक्षा कमी अंतरावर करू नका. पोल अर्थिंगच्या वायर्स तोडू नका. त्यामुळे शॉक लागण्याची शक्यता आहे. उंच धातूच्या वस्तू नेताना मार्गातील विद्युत तारांना स्पर्श होणार नाही याची खबरदारी घ्यावी. ट्रक अथवा उंच वाहनांच्या टपावर बसून प्रवास करू नये. शेतातील पिकांचे वा फळबागेचे प्राण्यांपासून संरक्षण करण्यासाठी तारेच्या कुंपणामध्ये वीजप्रवाह सोडू नये. अशा प्रकारे जीवित हानी होते. पूर किंवा अतिवृष्टीमुळे कोणत्याही क्षणी प्रतिकूल स्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्र आणि फिडर बंद करण्यात येतो. त्यामुळे वीजपुरवठा काही कालावधीसाठी बंद होतो. त्यामुळे ग्राहकांच्या वीजपुरवठा बंद होण्याच्या तक्रारी वाढतात. अशा स्थितीत संभाव्य धोका/अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे.

शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांसाठी 24 तास सुरू असलेल्या कॉल सेंटर्सचे 1912, 1800-212-3435 किंवा 1800-233-3435 हे टोल फ्री क्रमांक उपलब्ध आहेत. वीजसेवेच्या तक्रारींसह अतिवृष्टी किंवा वादळामुळे वीजपुरवठ्यात तांत्रिक बिघाड होऊन दुर्घटना होण्याची शक्यता आहे अशा ठिकाणांची माहिती टोल फ्री क्रमांकांवर देण्यात यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या कडेगाव मोहरमची जय्यत तयारी सुरू

## 29 जुलै रोजी होणार गगनचुंबी ताबूतांचा भेटी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**कडेगाव :** जातीय तणाव दंगली यामुळे सर्वत्र अस्थिर वातावरण असताना देशातील हिंदू मुस्लीम बांधवाना एकत्र आणण्यासाठी अनेकवेळा प्रयत्न झाले. त्यास म्हणावे असे यश आले नाही. पण सुमारे 150 वर्षापूर्वी हिंदू मुस्लीम ऐक्य साधून तीच परंपरा जोपासण्याचा अभिनव प्रयोग आपणास पहावयाला मिळतो तो सांगली जिल्ह्यातील कडेगाव येथील मोहरमच्या सणात. हिंदु- मुस्लिम ऐक्याचे प्रतिक म्हणून कडेगांव येथील मोहरम आणि गगनचुंबी ताबूत संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. त्यादृष्टीने कडेगावात मोहरमची जय्यत तयारी सुरू झाली असून गतीने ताबूत बांधकाम सुरू झाले आहे.

सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुका कराड –विटा मार्गावरील अंदाजे पंधरा ते वीस हजार लोकवस्ती असलेले एक गाव. या गावानेच मोहरमच्या निमित्ताने हिंदू-मुस्लीम ऐक्य घडवून जनतेसमोर आदर्श निर्माण केला.गगनचुंबी ताबुतांचा उत्सव साजरा करणारे कडेगाव संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. येथील मोहरमचा इतिहास वेगळा आहे.येथील मोहरम ब्राम्हणसमाजातील संस्थानिक श्रीमंत भाऊसाहेब देशपांडे यांनी सुरु केला.तर मोहरमनिमित्त काव्यरचना करीत हिंदू-मुस्लिम ऐक्य घडवण्याचे काम थोर संत सय्यदपीर साहेब हुसेन पिरजादे यांनी केले.सन 1885 पासून येथे उंच ताबूत बसवण्यात येतात. येथील संस्थानिक भाऊसाहेब देशपांडे यांचा कराड येथील मोहरम सनात त्यांचा अपमान झाला.त्यानंतर त्यांनी आपण कडेगाव येथे कराडपेक्षाहि उंच ताबुतांची यात्रा भरवू, असा निश्चय केला.आणि कडेगाव येथे उंच ताबूत करण्यास प्रारंभ केला.त्यासाठी लोकांना प्रोत्साहन दिले.घरे जमिनी दिल्या.तेव्हा पासून मोहरमला वेगळी दिशा प्राप्त झाली.

बकरी ईदनंतर ताबुतांच्या बांधणीला सुरुवात झाली आहे. प्रतिपदेच्या चंद्र पाहून कुदळ मारली जाते. हिंदू-मुस्लीम बांधव खांद्याला खांदा लावून ताबुतांची बांधणी करतात.या ताबुतांची बांधणी वैशिष्टपूर्ण असते.आधी कळस मग पाया यानुसार त्यांची बांधणी केली जाते. मोहरम निमित्त येथे चौदा ताबूत बसविले जातात.त्यापैकी निम्मे हिंदूचे असतात.गावचे सर्व मुस्लीम बांधव हिंदू बांधवांच्या सनात व हिंदू बांधव मुस्लिमांच्या सर्व सनात परंपरेनुसार एकमेकाना मानपान दिला जातो.

ताबुतांची उंची सुमारे 110 ते 135 फुटापर्यंत असते.बांधकाम कळकाच्या ( बांबूच्या ),चिकन मातीच्या सहाय्याने सुतातून केले जाते.ताबूत बांधताना कुठेही गाठ दिली जात नाही हे याचे खास वैशिष्ठे मानले जाते.संपूर्ण ताबुतांचे अष्टकोणी मजले तयार केले जातात. वास्तूशास्त्राच्या आधारावर बांधकाम केले जाते.ताबुतांचे बांधकामपूर्ण झाल्यावर त्यावर रंगीत आकर्षक कागद लावले जातात.विद्युत आकर्षक रोषणाई केली जाते.ताबुतांची उभारणी उर्दू मोहरम महिन्याच्या 9 तारखेला होणार असून भेटी सोहळा मोहरमच्या 10 तारखेला म्हणजे 29 जुलै रोजी होणार आहे.



**सर्वधर्मीय युवकांचे मोठे योगदान :** सध्या ताबूत बांधकामानिमित्त रात्री जागु लागल्या आहेत . ताबूत बांधकामास गती प्राप्त झाली आहे . कडेगाव मोहरम संपूर्ण भारतात प्रसिद्ध असल्याने हा सण आणखी आकर्षक व्हावा म्हणून सर्वजण प्रयत्न करताना दिसतात .यामध्ये सर्व धर्मीय युवकांचे मोठे योगदान दिसुन येते .



# वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचा भोकरदनमध्ये वर्धापनदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकरदन :** तालुक्यातील हसनाबद येथे वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचा सातवा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्यानिमित्ताने वर्धमान नागरी पतसंस्था आणि जालना येथील जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४९ दात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून रकदान शिबिरास प्रारंभ करण्यात आला.यावेळी संस्था अध्यक्ष शांतीलाल सिंगी,संचालक अविनाश कोटुंबे, शाखा सल्लागार रुपेश राठी,दिलीप लड्ढा, शंकर तंगे,राजू इंगळे,रमेश कुमावत, माजी सरपंच राजेश कंगले,भानुदास सोळुंके,विभागीय व्यवस्थापक दत्ता पवार,बाळकृष्ण रासने आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे विभागीय व्यवस्थापक दत्ता पवार यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या माध्यमातून चालणाऱ्या सामाजिक उपक्रमांविषयी माहिती सांगून खातेदारांसमोर हसनाबाद शाखेचा अहवाल मांडला.तर बाळकृष्ण रासने यांनी संस्थेच्या वतीने ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवा आणि सुविधांविषयी समाधान व्यक्त करत संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी जनकल्याण रक्तपेढीचे डॉ.राजकुमार झंवर,वंदना शेळके, अनुप मोहिते, भागवत वाघमारे, उज्ज्वला सिस्टर, पूजा चिप्पा, शाखा व्यवस्थापक दीपक तंगे,कर्ज अधिकारी बाळकृष्ण महाशब्दे, कॅशियर सचिन पवार,लिपिक मयूर वायकोस,रोहिणी राऊत, शिपाई विष्णू बोर्डे,नारायण जाधव यांसह खातेदार,कर्मचारी व पिग्मी प्रतिनिधी उपस्थित होते.






# साहेब, सरपंच, ग्रामसेवक शोधून द्या : त्रस्त नागरिकांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील रामपूर/रामेश्वर गावातील ग्रामस्थांना मागील दोन महिन्यापासून गावात पिण्यास पाणी नाही, नीट रस्ते नाहीत, रस्त्यावरील लाईटला पथदिवे नाहीत हे सर्व बघण्याची जबाबदारी असलेले ग्रामसेवक आणि सरपंचही सापडत नाहीत. त्यामुळे बेपत्ता झालेल्या सरपंच वं ग्रामसेवकाला साहेब शोधून द्या! अशी गळ ग्रामस्थांनी गट विकास अधिकाऱ्याना घातली आहे. रामपूर/रामेश्वर ही गावे सिरजखोड गट ग्रामपंचायती अंतर्गत येतात. मात्र मागील दोन महिन्यापासून या गावातील फिल्टर प्लॉट बंद असल्यामुळे गावकऱ्यांना धर्माबाद शहरातून अवास्तव पैसे मोजून पाणी विकत घ्यावे लागत आहे.तसेच मागील चार महिन्यापासून रस्त्यावरील पथदिवे बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी वृध्द, महिला व पुरुषाना बाहेर निघण्यास त्रास होत आहे.नुकतेच झालेल्या अतिवृष्टीमुळे येथील रस्ता उखडून गेला आहे.त्यावर चिखलाच साम्राज्य पसरले आहे.त्यामुळे मुलांना शाळेत जाण्यासाठी चिखलातून मार्ग शोधाव लागत आहे.
या समस्या सोडविण्यासाठी वारंवार ग्रामसेवक व सरपंच यांना विनंती करूनसुध्दा ते गावात फिरकत देखिल नाहीत.मात्र मलिदा खाण्यात गुंग आहेत.

ह्यांच्या ह्या मनमानी कारभारामुळे जनता वैतागल्यामुळे धर्माबाद गाठत गटविकास अधिकाऱ्यांना निवेदनाच्या माध्यमातून विनंती की केली की साहेब,हरवलेल्या ग्रामसेवकास व सरपंचाना शोधा! गावाची पहाणी करून गावाला समस्यामुक्त करा अशी मागणी केली आहे.हे निवेदन देताना भाजपा सोशल मिडीया जिल्हा सहसंयोजक नारायणपा.पवार व गावकरी उपस्थित होते.



# स्व.शिवाजीराव काळे पुण्यतिथी साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** माजी आमदार तथा शिवाजी नागरी बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व.शिवाजीराव काळे साहेब यांची दहावी पुण्यतिथी आज शिवाजी नागरी बँकेच्या सभागृहात साजरी करण्यात आली. यावेळी बँकेचे चेअरमन रवींद्र शिवाजीराव काळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले.
यावेळी व्हा.चेअरमन हरीपंडित गोसावी, भाऊसाहेब औटे, सतीश बलदवा रामचंद्र काळे, शंकरराव राऊत,अशोक जाधव, दृशरथ सोनवणे, पृथ्वीराज चव्हाण, रमेश खांडेकर,अरुण नरवडे, किशोर वैद्य, दृत्तात्रय फटांगडे, राजू टेकाळे, अप्पासाहेब गायकवाड,भाऊसाहेब पिसे , फाजल टेकडी,यशवंत काळे, राजू निवारे,अंबादास ढवळे, पवन लोहिया, अनिल राऊत, अशोक औटे, नरहरी जाधव, दादासाहेब सोनवणे,देविदास सोनवणे,याकुब् पठाण,संजय जाधव,बाळू खुळे,बिलाल पठाण, ज्ञानेश्वर पानखडे,बाळू गवारे,रामेश्वर बावणे, आप्पासाहेब मिसाळ, बप्पासाहेब सोनवणे,संतोष भोसले,बिलाल पठाण, सुदामराव वाबळे, विठ्ठल तळपे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ई आय पठाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जी व्ही म्हस्के,शाखाधिकारी संतोष राऊत, विजय पोषणगीर, सुभाष काळे,सुधाकर शिंदे, बाळासाहेब दसपुते, कृष्णा काकडे, ईश्वर ढोकळे,रत्नदीप मुळे, चंद्रकांत पर्वत, मेघा श्रीवास्तव,रेवती राजनिकर, सुभद्रा सोंडगे, पवन काळे, किशोर धोकते, अमर तावरे, बाळू ढोणे, आशिष पवार,फोजदार जाधव , आबेद् पठाण , भाऊसाहेब कणसे, मंदा मोरे आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** जिल्ह्यात ढगफुटीसदृश झालेल्या पावसामुळे ४७ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या युवकाचा मृतदेह आढळून आला. पावसामुळे ३१३ घरांची पडझड झाली. मदत व बचावकार्य पथकाकडून करण्यात येत आहे. रविवारी दिवसभर पावसाने उसंत घेतली.
अकोला जिल्ह्यात २२ जुलैला १०० मि.मी.पेक्षा अधिक पाऊस झाला. तेल्हारा तालुक्याला अतिवृष्टीने झोडपून काढले. तेल्हारा तालुक्यातील विद्रुपा नदीला पूर आला होता. या पुरात वाहून गेलेल्या अंकित संग्राम ठाकूर ( ३२ ) या तरुणाचा मृतदेह रविवारी आढळून आला. जिल्ह्यात एकूण ३१३ घरांचे नुकसान झाले. ३११ घरांचे अंशतः तर दोन घरे पूर्णपणे पडली आहेत.

# आगरनांदुरला गावकरी घेतात ५ रूपयाला हंडाभर पाणी; ग्रामपंचायतची उदासीनता

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील आगरनांदुर ग्रामस्थाला आजही करावी लागते पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती आगरनांदुर ग्रामपंचायत आपेगाव ग्रामपंचायत मधून स्वतंत्र झाल्यावर ग्रामस्थाना सोई सुविधा मिळतील असे वाटले होते.परंतु स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन होवून वर्षे उलटले तरीही सरपंच गावला पिण्याचे पाणी उपलब्ध करून देता आले नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी ५ रूपयाला हंडाभर पाणी विकत घ्यावे लागत असल्याने एका कुटुंबाला कमीतकमी रोज २० चा खर्च सोसावा लागत आहे. आगरनांदुर गावात रस्त्याचे ही सुविधा नसल्याने झोपडपट्टी भागात अरोग्यचा प्रश्न निर्माण होताना दिसत आहे.
स्वतंत्र ग्रामपंचायत झाल्यावर नवीन सरपंचानी ग्रामपंचायत ईमारतीसाठी मागणी करून ईमारत उभारली पण पाण्याची सोय केली नसल्याने आगरनांदुर येथील गावकर्यांना पाण्यासाठी पैसे मोजावे लागत असल्याने रोष व्यक्त होताना दिसतो.





पैठण तालुक्यातील आगरनांदुर ग्रामपंचायत स्वतंत्र होवुन जवळपास वर्षे लोटले तरीही ग्रामस्थाना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होत नसल्याने नागरीकात नाराजी आहे .परंतु गावकर्यांना लवकरच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ग्रामपंचायत करेल त्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहु . **मनोहर थोरात, ग्रा .प .सदस्य आगरनांदुर**









# लोह्यात छत्रपती शिवाजी महाराज चौक पुतळा परिसराची दुरवस्था

## प्रशासनाचे दुर्लक्ष तर शिवप्रेमींचा आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नांदेड लातूर राष्ट्रीय महामार्गावरील शहरातील मुख्य असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज नामक चौकातील गोलईची प्रचंड दुरवस्था झाली असून गोलाईच्या आवार भिंतींची सर्व बाजूंनी पडझड झाली असून संबंधित प्रशासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष झाल्याने शिवप्रेमी नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. सदर गोलाईची तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवप्रेमी नागरिकांनी दिला आहे.

लोहा शहराच्या सौंदर्यात भर टाकणारा शिवरायांचा अश्वारूढ पुतळा महामार्गावरील गोलाईत बसविण्यात यावा या मागणीसाठी जवळपास अनेक वर्षांपासून सामाजिक तसेच राजकीय पक्ष संघटना व नेत्यांनी विविध मार्गांनी आंदोलने केली. सर्वसामान्य शिवप्रेमी नागरिकांच्या प्रयत्नाला यश मिळून मागील तीन चार महिन्यांपूर्वी गोलाई लगत बळीराजा मार्केटच्या जागेत रीतसर परवानगी घेवून सदरील ठिकाणी शिवरायांचा अश्वारूढ पुतळा



उभारला. परंतु गोलाईकडे संबंधित प्रशासनाचे सपशेल दुर्लक्ष झाल्यामुळे गोलाईच्या आवार भिंतीस अवजड वाहनानी धडक दिल्यामुळे आवार भिंतीची मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याने गोलाईची दुरवस्था झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक गोलाईची तत्काळ दुरुस्ती करून त्यात बसविण्यात आलेल्या हायमास दिवाबत्तीची दुरुस्ती करण्यात यावी. तसेच गोलाईत उभारण्यात आलेला भगवा ध्वज मोठ्या व उंच स्तंभात उभारावा. विशेष म्हणजे गोलाई लगत नांदेड-लातूर आणि कंधार-पालम या मुख्य शिवाजी महाराज चौकातील अनधिकृत अतिक्रमण, हातगाडे, फेरीवाले, अवैध प्रवासी वाहतूक करणारे वाहने यांच्यावर कार्यवाही करून शिवाजी महाराज चौक अतिक्रमण मुक्त करावा अन्यथा छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानच्या वतीने लवकरच तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# वडोद बाजार येथे धूर फवारणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील  रोजी दिनांक 26/07/2023 प्राथमिक केंद्र अंतर्गत डास साठी धूर फवारणी करण्यात आली त्यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र वडोद बाजार येथील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर आशा काथार मॅडम. डॉक्टर शेख जमील, गोविंद पांडेजी .पत्रकार हेमंत वाघ. सरपंच पदी साबीर पठाण ग्रामपंचायत सदस्य शुभम गंगाने  व आरोग्य कर्मचारी आरोग्य सहाय्यक मच्छिंद्र ठाकरे भगवान बलांडे  फार्मसी ऑफिसर  रमेश. चव्हाण  आरोग्य सेवक दिपक वाढेकर वाडेकर . स्वप्निल नगरे. सुधस कुदळे तसेच वडोद बाजार  वडोद खुर्द धाडी भालगाव सर्व परिसरामध्ये डासासाठी धूर फवारणी करण्यात आली ग्रामस्थ उपस्थित होते.



# ४० वर्षे जुन्या इमारतीवर बांधकाम; विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एन-६, संभाजी कॉलनी, औरंगाबाद येथील महानगरपालिकेच्या शाळेची इमारत द वर्ल्ड स्कुल, औरंगाबाद या शाळेस भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे, सदर इमारत ही ४० वर्षे जुनी आहे. मात्र, द वर्ल्ड स्कुल, औरंगाबाद या भाडेकरु शाळा व्यवस्थापनाने या इमारतीवर नवीन इमारत बांधण्याचे काम सुरु केले आहे. परंतू, सदर मनपा शाळेची इमारत ही अत्यंत व जीर्ण झालेली असून इमारतीस तात्पुरत्या स्वरुपात डागडुजी करुन शाळेत प्ले ग्रुप ते इयत्ता १० वी पर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत आहे.

इमारतीचे स्लॅब देखील कमकुवत असून स्लॅब कोसळण्याची शक्यता वाटत आहे. हा धोका असतांनाही शाळेच्या प्रशासनाने इमारतीवर विद्यार्थ्यांची सुरक्षितेतेची कुठलीही काळजी न घेता सुरु केले आहे. या बिल्डींगवरती बांधकाम साहित्य, पत्रे, बल्ल्या, विटा, सिमेंट आणून ठेवले आहे. बांधकाम सध्या पावसाळा सुरु असल्याने वादळ वाऱ्यामुळे इमारतीवर ठेवलेले बांधकाम साहित्य व पत्रे हे उडून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व परीसरातील नागरीकांच्या जीवीतास हानी किंवा अपघात होवून ईजा पोहोचू शकते. तसेच, सदर इमारत ही ४० वर्षापुर्वीची असल्याने तिचे इमारत ऑडीट करुन इमारतीचा स्लॅब अतिरिक्त वजन झेलण्यास व स्लॅबवर नवीन बांधकाम करण्यास सक्षम आहे का, हेही तपासणे आवश्यक आहे. तसेच, द वर्ल्ड स्कुल प्रशासनाने बांधकाम करण्यासाठी नगरविकास, बांधकाम विभाग, मनपा, सिडको प्रशासनाची परवानगी घेतली आहे का, याची चौकशी होणे क्रमप्राप्त आहे. शाळेच्या इमारतीवर बांधकाम करण्यासाठी मनपाने ठराव मंजुर केला आहे का किंवा यासंदर्भात नाहरकत दिली आहे, याची चौकशी करण्यात यावी.

सद्यःस्थितीत चालू असलेले बांधकाम हे विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका पोहोचविणारे आहे. त्यामुळे हे बांधकाम तात्काळ थांबवून हजारो विद्यार्थ्यांचे जिवीताचे रक्षण करावे, अशा मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( खरात ) पक्षाच्या वतीने आज दि. २० जुलै  रोजी अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांना  जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे नरवडे यांच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले.  यावेळी अमोल परभाळे, विजय चाबुकस्वार उपस्थित होते.






# बोडखा शिवारात पीक पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बोडखा गावच्या शिवारात ई.-पीक पाहणी व नोंद कशी करावी याबाबत सोमवारी ( ता. २४ ) शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आपणच आपला पिपेरा व नोंद करावी या उद्देशाने शेतकऱ्यांन शेतात बोलावून ई. पीक पाहणी व त्याची नोंद कशी करण्यात येते. याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बोडखा येथील गट क्रमांक ३७८ मधील मका पेरा असलेल्या शेतात तलाठी उज्वला वाघमारे, पोलिस पाटील रायभान सोनवणे यांच्या उपस्थितीत पीक पाहणी करण्यात आली. यावेळी गावकऱ्यांनी लवकरात लवकर ई.-पीक पाहणी करून पीक पेऱ्याची नोंद त्वरित करावी, अ आवाहन करण्यात आले.

# दहशत माजविणाऱ्या गुंडांची पोलिसांनी काढली धिंड

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील किरकटवाडी भागात एका उपाहारगृहात तोडफोड करून दहशत माजविणाऱ्या गुंडांची हवेली पोलिसांनी धिंड काढली. सराईत गुंड वैभव इक्कर आणि साथीदार चेतन चोरघे ( दोघे रा. कोल्हेवाडी, सिंहगड रस्ता ) यांनी दोन दिवसांपूर्वी सिंहगड रस्त्यावरील एका उपाहारगृहात तोडफोड केली होती. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर हवेली पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना दोघांनी शिवीगाळ केली होती. आरोपी वैभव इक्कर सराईत असून, त्याच्याविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. हॉटेलमध्ये तोडफोड करून दहशत माजविल्या प्रकरणी इक्कर आणि साथीदार चोरघे यांच्याविरुद्ध हवेली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर इक्कर आणि साथीदारांची दहशत मोडीत काढण्यासाठी हवेली पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी अनमोल मित्तल यांनी कारवाईच्या सूचना दिल्या. इक्कर आणि चोरघे यांना घेऊन पोलिसांच्या पथकाने सिंहगड रस्त्यावरील किरकटवाडी, कोल्हेवाडी भागातून धिंड काढली. यापूर्वी किरकटवाडी परिसरात गुंडांनी दहशत माजविल्याची घटना घडली होती.



|| नमो ||
शुभ कार्य
तुमचे व्यवस्था
आमची



विनोद मंडप
डेकोरेटर्स अँड केटरर्स
लग्न, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, वास्तूशांती,
शुभ कार्याच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.
प्रो.प्रा. विनोद जोगदंडे
9158500727, 8446185722
टाऊन हॉल, व्हीआयपी रोड, छत्रपती संभाजीगर

# सोयगाव तालुक्यात पिकांना जीवदान; पण नदी -नाले अद्यापही कोरडेठाक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात यंदा दमदार पाऊस झालाच नाही. आतापर्यंत झालेल्या भिजपावसावर ग्रामीण भागातील मोलखेडा, डाभा, टिटवी, देव्हारी, नांदा तांडा व सावळदबारासह पिके बहरली आहे. सावळदबारा येथील कांगनदी नदी, नाले, पाझर तलाव व प्रकल्प कोरडेच आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस झाला नसल्याने यंदा तरी चांगला पाऊस होईल अशी आशा शेतकऱ्यांना होती. पुन्हा पावसाने चकवा दिल्याने शेतकऱ्यांवर चिंतेचे ढग जमा झाले आहेत. सध्या सुरू असलेल्या रिमझिम पावसाने परिसरातील शेतशिवार हिरवेगार झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तणनाशक फवारण्या, कोळपणी, किटकनाशके करून आंतरमशागतीची कामे केली. पिकांची सद्याची स्थिती समाधानकारक झाली आहे. रिमझिम पावसामुळे पिकांवर रोगांचे प्रमाण वाढले आहेत.



शेतकऱ्यांनी कीटकनाशक फवारणी करून पिकांवरील रोग काही प्रमाणात आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरीकडे ग्रामीण भागात पावसाने चकवा दिल्याने नदी नाल्यांना अद्यापही पाणी वाहिले नाही.२६ जुलै महिना संपण्याला पाचचा कालावधी राहिलेले आहेत. नदी, नाले पावसाअभावी तहानलेले आहे. पावसाच्या प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी धोका पत्करत लागवड सुरू केली आहे. ग्रामीण भागातील नदी, नाले साधारण जूनमहिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून वाहू लागतात. सर्वदूर पावसाच्या सरी बरसतात. कभी मुसळधार तर कधी मध्यमस्वरूपाच्या कोसळणाऱ्या पावसाचा यावर्षी मात्र पिकांच्या अद्यापही सर्वदूर पसरण्याचा थांगपत्ता नाही. कधी या भागात तर कधी त्या भागात पाच ते सात मिनीटच पाऊस होत आहे.

# मुसळधार पावसामुळे नद्या, नाले तुडुंब भरले

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जलपातळीत वाढ करून शेतीला सिंचनाची जोड मिळावी म्हणून उन्हाळ्यात जलसंधारणाची कामे करण्याचे संकेत आहेत. मात्र, मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत नाला खोलीकरण व रुंदीकरणाची कामे ऐन पावसाळ्यात सुरू झाली. काही कामे पूर्ण झाली तर काही कामे सुरू असतानाच जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला. यामुळे अनेक कामाचा खोळंबा होणार असून सिंचनाचा प्रश्न कसा मार्गी लागेल, असा प्रश्न शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे. जिल्ह्यातील जवळपास ७६ गावांत नाला खोलीकरण व रुंदीकरणाची कामे सुरू आहेत. नाल्यातील साचलेल्या गाळाचा उपसा करून पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची साठवण क्षमता वाढेल व शेतीला पाण्याची व्यवस्था होण्यास हातभार मिळेल, या आशेवर नाला खोलीकरण व रुंदीकरण केले जात आहे. ही कामे पावसाळ्यापूर्वी होण्याचे संकेत आहेत. परंतु जुलै महिन्यात ही कामे सुरू झाली. कामे सुरू असतानाच जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाल्यामुळे नद्या, नाल्यांना पूर आले. त्यामुळे अनेक कामांचा खोळंबा उडणार आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्चून होत असलेल्या कामांतून किती सिंचन क्षमता वाढेल, असा प्रश्न शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.

जिल्ह्यात ऐन पावसाळ्यात नाला खोलीकरण व रुंदीकरण केले जात असल्याने शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त केली जात आहे. बहुतांश ठिकाणी कामाची माहिती दर्शविणारे फलक लावण्यात आलेले नाहीत. लाखो रुपये खर्चून होत असलेली ही कामे गुणवत्तापूर्ण आहेत की नाही ? याची पडताळणी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी 'ऑन दी स्पॉट' जाऊन मोजमाप घेण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# अडीच लाखांसाठी दोंडाईचात तरुणावर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** व्याजाने दिलेले अडीच लाख रुपये वसूल करण्यासाठी जिवे मारण्याची सुपारी देण्यात आलेल्या दोघांनी तरुणावर बंदूक रोखून चाकूने वार केले. दोंडाईचा येथील उड्डाणपुलाखाली रविवारी रात्री हा प्रकार घडला असला तरी तिघांविरूद्ध दोंडाईचा पोलीस ठाण्यात दोन दिवसांनी गुन्हा दाखल झाला. पैकी एकास अटक करुन पोलिसांनी त्याच्याकडून एक बंदूक आणि तीन जिवंत काडतूसे जप्त केली आहेत. व्याजाने दिलेले अडीच लाख रुपये वसूल करण्यासाठी जिवे मारण्याची सुपारी देण्यात आलेल्या दोघांनी तरुणावर बंदूक रोखून चाकूने वार केले. दोंडाईचा येथील उड्डाणपुलाखाली रविवारी रात्री हा प्रकार घडला असला तरी तिघांविरूद्ध दोंडाईचा पोलीस ठाण्यात दोन दिवसांनी गुन्हा दाखल झाला. पैकी एकास अटक करुन पोलिसांनी त्याच्याकडून एक बंदूक आणि तीन जिवंत काडतूसे जप्त केली आहेत. याप्रकरणी मेहुल मेसुलिया ( २८, रा. सुरत ) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अभिषेक गोस्वामी ( रा. बेसुरोड, सुरत ) याने मेसुलिया यांना व्याजाने दोन लाख ५० हजार रुपये दिले होते. हे पैसे मेसुलिया यांनी आर्थिक अडचणीमुळे परत न केल्याने गोस्वामीने वसुलीची जबाबदारी समाधान राजपूत ( रा. दोंडाईचा ) आणि सिद्धार्थ उर्फ सिद्धु थोरात ( रा. नवसारी,गुजरात ) यांच्यावर सोपविली होती. या दोघांना मेसुलिया यांना ठार करण्याची सुपारीही देण्यात आली होती. समाधान आणि सिद्धार्थ या दोघांनी मेसुलिया यांना नंदुरबार चौफुलीवरील पान टपरीवर गाठले.



# सीएससी चालकांकडून शेतकऱ्यांची लूट

आधुनिक केसरी न्यूज

**जत/सांगली :** जत तालुक्यातील पिक विमा भरून घेताना शेतकऱ्यांकडून लुबाडणुक होताना दिसून येत आहे. सरकारने शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मात्र एक रुपया केला आहे याव्यतिरिक्त एकाही 'सीएससी' केंद्राला अधिक पैसे देऊ नये कारण विम्याची रक्कम एक रुपये व शासनाकडून सीएससी केंद्र चालकाला चाळीस रुपये मिळत असते. याबाबत जास्त रक्कम कोणी मागत असेल तर तहसीलदार किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तक्रार करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी यांनी केली आहे असे असून सुद्धा शेतकऱ्यांची लुबाडणूक होत आहे. पिक विमा भरण्यास गेलेल्या शेतकऱ्यांकडून दीडशे - दोनशे ते 250 पर्यंत लुबाडणूक होत आहे. जाब विचारणाऱ्या शेतकऱ्यांची फॉर्म न भरण्याची भीती घातली जात असल्याने याबाबत शेतकरी हतबल होऊन सांगेल तेवढे पैसे देऊन पिक विमा भरत आहेत.

नैसर्गिक आपत्ती व इतर कारणांमुळे पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतो. अशा वेळी शेतकऱ्यांना पिकाची नुकसान भरपाई मिळावी म्हणून सरकारच्या वतीने 'पंतप्रधान पीक विमा योजना' सुरू करण्यात आली. या पूर्वी पिकविम्याच्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागत होती. मात्र यंदा एक रुपयात पिकविमा काढून मिळणार आहे. सध्या शेतकऱ्यांनी खरीप पिकाची पेरणी केली आहे. या पिकाला संरक्षण मिळावे, यासाठी सरकारने पीक विमा योजना सुरू केली. पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना पिकासाठी संरक्षित असणारी रक्कम मिळणार असून, या वर्षापासून एका पिकाला केवळ एक रुपया लागणार आहे. एका शेतकऱ्याचे फॉर्म भरल्यानंतर साएससी चालकाला शासनाकडून चाळीस रुपये मिळणार आहेत असे असताना सीएससी मधून पिक विमा भरण्यास आलेल्या शेतकऱ्यांकडून मात्र आगाऊ रक्कम घेऊन लूट सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत कृषी कार्यालयात विचारणा केली असता शेतकऱ्यांच्या लेखी तक्रारी आल्याशिवाय सीएससी धारकांवर कारवाई करता येणार नाही असा खुलासा करण्यात आला. मग या सीएससी चालकांवर नेमके कुणाचे अंकूश आहे याबाबतच निश्चितता नसल्याने यांच्याकडून मात्र शेतकऱ्यांची उघडउघड लुबाडणूक होताना दिसत आहे.

पिक विम्याची मुदत अंतिम टप्प्यात असून पिक विमा भरण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी येणाऱ्या तीन चार दिवसात वाढणार आहे. तरी संबधित विभागाने अश्या पध्दतीने शेतकऱ्यांकडून आगाऊ रक्कम घेणार्या सीएससी केंद्र चालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# जळगाव येथे प्रयास युथ फोरम व सोशल अवेअरनेस फाऊंडेशनच्या वतीने जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** प्रयास युथ फोरम &सोशल अवेअरनेस फाऊंडेशन तसेच सारस्वत बँक यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संस्कृती जोपासली जावी यासाठी महाराष्ट्र भर जो लायब्ररी सेटअप वितरणाचा कार्यक्रम सुरू करण्यात आला होता. त्याचे आज अंजनविहीरे येथे ग्रामविकास मंच यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या सार्वजनिक वाचनालयाला लायब्ररी सेटअप वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. नगरसेविका योजना ताई पाटील. डी. डी. पाटील सर, व्ही. एस. पाटील सर तसेच ग्रामविकास मंच चे डॉ. प्रतापराव पाटील, दिपक पाटील,प्रविण बोरसे सर, मनोहर पाटील, नंदकुमार पाटील,व गावातील नवतरुण वर्ग व जेष्ठ मंडळी उपस्थित होते, तसेच प्रयास युथ फोरम चे नेहाताई मालपुरे, दर्शना गोसावी, शुभम रणदिवे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे डी. डी. पाटील सरांनी विद्यार्थ्यांना करिअर विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रवीण बोरसे सरांनी केले.








आपल्या स्वप्नपुर्तीसाठी, आपुलकीचा हातभार...

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो. लि.,परळी वैजनाथ

- बँकींग
- आरोग्य
- शिक्षण
- रियल ईस्टेट
- इन्शुरन्स

- मुख्य कार्यालय : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि.बीड मो.9130072178/9130072188
- कॉर्पोरेट ऑफिस : २०५/२०६, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड शाखा, आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर, मो.9130072176

Toll Free No : 1800 419 7501 Web : www.rajasthanimultistate.in

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# राज्यात 'सलोखा' योजनेचा पहिला लाभार्थी भोकरचा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** कृषी प्रधान देशात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनातर्फे विविध योजनाची अंमलबजावणी केली जाते. शेती व्यवसाय करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते यातुन त्यांची सुटका व्हावी म्हणून शासनाने नुकतीच "सलोखा " योजना सुरू केली. सदरील योजनेचा राज्यात पहिला लाभार्थी हा भोकर तालुक्यातील असून अवघ्या दिड महिन्यात शेतकऱ्यांना न्याय मिळाला आहे.यासाठी महसूल आणि दूय्यक निबंधक विभागाने मोलाचे सहकार्य केले आहे. #शेतकरी हा देशाचा आर्थिक कणा म्हणून ओळख आहे. राज्यातील बहुतांश भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. कृषी प्रधान देशातील शेतकरी सुखी समाधानी असेल तरच देशाची उन्नती होईल.याच मुळ हेतुने शासन स्तरावर शेती व्यवसायास प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे.तरी शेतकऱ्यांना म्हणावा तसा दिलासा मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.शेती व्यवसाय



करताना शेतकऱ्यांना ब-याच अडचणीचा सामना करावा लागतो आहे.या जाचातुन सहिसलामत सुटका करण्यासाठी शासनाने जानेवारी २०२३ मध्ये "सलोखा" योजना प्रारंभ केली आहे.यात प्रामुख्याने बारा वर्षांपासून ज्याचा शेतीवर ताबा आहे. अशा शेतकऱ्यांना सोयीची शेती करण, दोघांच्या संमतीने शेतीची अदलाबदल करणे.नाममात्र मूद्रांक शूल्क दोघांना प्रत्येकी एक हजार रूपये असे एकूण दोन हजार रूपयात रजिस्ट्रीची करून देण्याची सवलत आहे. सदरील योजना हि जानेवारी २०२३ पासून राज्यात प्रारंभ करण्यात आली असून हि योजना केवळ दोन वर्षांसाठी राहणार आहे. ज्या शेतकऱ्यांची समस्या असेल त्यांनी योजनेत सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार राजेश लांडगे यांनी केले आहे.

शासनाने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी "सलोखा" योजना जानेवारी २०२३ ला सुरू केली. १५ फेब्रुवारी२०२३ रोजी खरबी ( ता.भोकर )येथील शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे.विशेष म्हणजे केवळ दिड महिन्यात राज्यात पहिला लाभ मिळवण्याचा" मान" हा भोकर तालूक्याने मिळवून शासनाचा हेतू पूर्ण करण्यासाठी हातभार लावल्याने सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेऊन शासनाला सहकार्य करावे असे आवाहन महसूल विभागाने केले आहे.

**पहिला लाभार्थी भोकरचा :** खरबी ( ता . भोकर ) शेतकरी कीशन बळीराम कल्याणकर व शिवाजी विठ्ठल कल्याणकर हे दोघे चूलत भाऊ आहेत .त्याना शेतीची अदलाबदली करावयाची होती पण मूद्रांक शूल्क चार लाख रुपये लागत असल्याने तो प्रश्न रेंगाळत होता . सलोखा योजनेची माहिती सोशलमिडीयावर प्रसिद्ध झाल्याने त्यांनी येथील तहसीलदार राजेश लांडगेआणि दूय्यम निबंधक अधिकारी संतोष कौशल्य याची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली असता योजनेतून केवळ दोन हजार रुपये मूद्रांक शूल्कात रजिस्ट्रीसह शेतीची अदलाबदली करून मिळेल असे सांगितले नव्हे तर त्यांना न्याय मिळवून दिला आहे . यावेळी मंडळ अधिकारी शेख मुसा, तलाठी संदीप केंद्रे, यांनी मोलाचे सहकार्य केले आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाचे व संबंधित अधिकाऱ्यांचेआभार व्यक्त केले आहे .

# घरकुलाची बिले तत्काळ काढा

## नगरसेवक करीम शेख : अभियंत्यांना सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील घरकुलाचे बीले तात्काळ काढा अशी सुचना नगरसेवक करीम शेख यांनी घरकुल विभागाचे अभियंता रमेश नाईक यांना केली आहे.

लोहा शहरात पंतप्रधान घरकूल आवास योजने अंतर्गत अनेक गोरगरिब नागरिकांनी घरकुलाचे जवळचे पैसे खर्च काम बाहेरील कर्ज काढून उधारीवर माल मटेरिअल घेऊन पूर्ण केले आहे पूर्ण केले. घरकुल योजनेचे लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले असून याबाबत लोहा न.पा.चे नगरसेवक करीम शेख यांच्याकडे अनेक लाभार्थ्यांनी कैफीयत मांडली असता त्यांनी लोहा न.पा.त जाऊन घरकुल योजनेचे अभियंता रमेश नाईक यांना बोलावून घरकुल घेऊन त्यांना सुचना केली घरकुलाचे बीले काढलेत नागरिकांना चांगले वाटेल घरकुलाचे बीले निघाले नसल्याने लाभार्थी अडचणीत आहेत. घरकुलाचे बीले काढण्यात काय अडचण आहे बजेट आहे की नाही असे विचारले असता अभियंता रमेश नाईक यांनी सांगितले घरकुल योजनेसाठी बजेट असुन सगळे प्रोसेसर तयार नविन मुख्याधिकारी संतोष वाघमारे यांनी काल पदभार स्वीकारला आहे आज ते आले नाहीत ते आल्यानंतर घरकुलाचे बीले निघतील व लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होतील असे अभियंता नाईक यांनी नगरसेवक करीम शेख यांना सांगितले.

यावेळी मिडिया पोलिस सोशल क्लब पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास सावळे, बाळू पाटील पवार, छायाचित्रकार विनोद महाबळे उपस्थित होते.



# सरपंचाला भ्रष्टाचार करणे पडणार महागात

## पदाची प्रतिमा सुधारण्यासाठी शासनाचा आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सरपंच गावाचा प्रथम नागरिक असण्याबरोबरच गाव पुढारीही असतो. गावाच्या विकासकामांमध्ये भ्रष्टाचार होत असून त्यात सरपंच केंद्रस्थानी राहत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. यामुळे सरपंच पदाची प्रतिमा मलीन होत आहे. सरपंचाने भ्रष्टाचार केल्यास आता थेट तुरुंगाची हवा खावी लागणार आहे. तसा निर्णय शासनाने घेतला असून त्यासंदर्भात आदेशही काढण्यात आले आहेत.

गावागावी ग्रामपंचायतीकडून शासकीय योजना राबवित असताना भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली आहेत. असे प्रकार गंभीर ग्रामसेवकांवर राहणार वॉच एखाद्या ग्रामपंचायत ग्रामसेवकाने नोकरी

लागल्यापासून नोकरीच्या दहा वर्षांनंतर भ्रष्टाचार केला असेल

तर त्याच्या नोकरीच्या पहिल्या दिवसापासून तपास करण्या बाबत निर्णय देखील ग्राम विकास मंत्रालयाने घेतला असल्याने प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांचे सुध्दा धाबे दणाणले आहे. स्वरुपाचे असल्याने प्रशासनाने आता फौजदारी कारवाईबरोबरच अपहार केलेली रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. या गुन्ह्यात जबाबदार संबंधित सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, लिपिक, कर्मचारी यापैकी कोणीही अथवा सर्वजण चौकशीअंती दोषी आढळल्यास संबंधित पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, असे आदेशात नमूद केले आहे.

सरपंच आणि ग्रामसेवक या कर्तव्यदक्ष अधिकारी व पदाधिकार्यांच्या संगनमताने अनेक गावांची वाट लागल्याच्या तक्रारी शासन दरबारी दाखल झाल्या आहेत. राज्य सरकारचा विविध प्रकारचा निधी आता थेट ग्रामपंचायतींना येत आहे. निधीचा गैरवापरचे प्रकार वाढत असल्याच्या तक्रारी ग्रामविकास विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. राज्य शासनाने प्रयत्न केले आहेत.अपहाराच्या रकमेत विभागीय चौकशीमध्ये गुन्हा घडल्याबाबत निष्कर्ष काढण्यात आल्यास संबंधिताविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच ज्या प्रकरणामध्ये कोणतीही चौकशी झालेली नाही, अशा प्रकरणी संबंधित पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशी करावी. चौकशी महिन्यामध्ये पूर्ण करणे अनिवार्य केले आहे.

# भिंत कोसळून महिला ठार, एक जण गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** कोल्हापूरातील दिन ऐतिहासिक वास्तूंना जोडणारी संरक्षक भिंत मंगळवारी सायंकाळी कोसळली. या भिंतीच्या ढिगाऱ्याखाली सापडून एका महिलेचा मृत्यू झाला असून दुसरी जखमी झाली आहे. काही वाहनांची नासधूस झाली आहे. खासबाग मैदान त्यालगत असलेले केशवराव भोसले नाट्यगृह या दोन्ही वारसाहक्क स्थळातील महत्वपूर्ण वास्तू आहेत. केशवराव भोसले नाट्यगृह स्वच्छतागृहाला लागून असलेली खासबाग मैदानाची संरक्षण भिंत सायंकाळी कोसळली. त्यामध्ये दोन महिला सापडल्या होत्या. त्यांना बाहेर काढून उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यातील अश्विनी आनंदा यादव ( वय ४५, कसबा बावडा ) या महिलेचा मृत्यू झाला. संध्या प्रशांत तेली ( वय ३० रा. वडणगे, ता करवीर ) ही गंभीर जखमी झाली आहे. कोल्हापूर महानगरपालिका अग्निशमन दलाकडून बचाव कार्य सुरु करण्यात आलेर आहे. आमदार ऋतुराज पाटील यांनी घटनास्थळी पाहणी केली.कोल्हापूर शहरातील धोकादायक इमारती काढून घेण्यासाठी महापालिका प्रशासन मोहीम राबवत असते. पण स्वमालकीच्या ऐतिहासिक वास्तूंची दुरवस्थेकडे लक्ष पुरवले जात नाही.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर